विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ११३**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष आठवे / अंक २ / जानेवारी २००७

## संपादकीय

### २००६ ते २००७

कालाच्या असीम अशा अस्तित्व जाणीवांमध्ये २००७ नावाची नवीन जाणीव या एक तारखेपासून मोजली जाईल. काळ कोणासाठी थांबत नसतो; मात्र त्याचे संदर्भ क्षणागणिक बदलत रहातात व अशा बदलाचेच नाव जीवन आहे. ज्या क्षणी हे बदल थांबतात, त्या क्षणी बदल जाणवणाऱ्या जीवनाचा अंत झालेला असतो.

२००७ सालात आमच्या सर्व घटक संस्थांची वाटचाल नवीन ज्ञानक्षेत्रांच्या संदर्भात कालसुसंगत अशीच होईल. छायाचित्र संग्रहाचा प्रकल्प मार्गी लागून १९३२ पासूनच्या छायाचित्रांकित क्षणांचे संग्रहालय अस्तित्वात आणण्याचा आमच्या मंडळाचा प्रयत्न आहे. आमच्या व आमच्या घटक संस्थांच्या संग्रहात छायाचित्रे आहेतच; मात्र या व्यतिरिक्त मंडळाच्या हितचिंतकांकडे काही दुर्मिळ छायाचित्रे असतील तर त्यांनी आमच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आमचे सांगणे आहे.

२००६ साली कागदविरहित, संगणकीकृत प्रवेश देण्याचा प्रकल्प आम्ही यशस्वीरीत्या राबवला. यंदा अधिक आवश्यक सुधारणांसह आम्ही हा प्रकल्प राबवू. महाराष्ट्रात आजही आमची संस्था याबाबत अग्रेसर व एकमेव आहे. हजारो विद्यार्थ्यांचे प्रवेश संगणकीकृत करून उद्याच्या दिशेने आम्ही वाटचाल सुरू केली आहे.

आमचे आंतरजालातील (इंटरनेट) संकेतस्थळ हो आता चांगलेच स्थिरावले असून रोज अनेक जणांकडून संकेत स्थळामार्फत संपर्क साधला जातो. याबाबत वेळोवेळी आमचे तंत्रज्ञ सुधारणा करतात, बदल करतात.

२००६ सालची 'दिशा' च्या दृष्टीने महत्त्वाची ठरणारी घटना म्हणजे आमचे संपादक व मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांना रॉयल एशियाटिक सोसायटीचा मिळालेला बहुमान. याशिवाय गतकाळातील बऱ्याच नोंदी करता येऊ शकतील, तूर्त २००७ च्या नियोजनासाठी दिशान्वित व्हावयाचे आहे !




वर्ष आठवे / अंक २ / जानेवारी २००७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे / अंक ७ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | योगी श्री अरविंद (लेखांक तिसरा) | शं.बा.मठ | ३ |
| २) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | यशवंत साने | ८ |
| ३) | या चित्रांमागे दडलंय् काय ? | सौ. मंजिरी दांडेकर | १५ |
| ४) | देहेत्यागिता | सौ. मालती देवधर | १६ |
| ५) | भारतीय उत्सव | मोहन पाठक | १८ |
| ७) | माझा शैक्षणिक प्रवास व ग्रंथालये | योगंधरा प्रकाश बढे | २२ |
| ८) | गीताई - विनोबा | आशा भिडे | २४ |
| ९) | परिसरातील वृक्ष - बहावा | डॉ. मोझेस कोलेट | २५ |
| १०) | कहाणी कोयनेची | सौ. मानसी देशमुख | २७ |
| ११) | पुण्यस्मरण | अविनाश गायतोंडे | २९ |
| १२) | परिसर | | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# योगी श्री अरविंद
## (लेखांक तिसरा)

*योगी अरविंद यांच्या चरित्राचा पुढील भाग येथे देत आहोत - संपादक*

१९०७ साली मिदनापूर व नंतर हुबळी अधिवेशनात श्री अरविंद यांनी राष्ट्रवादी पक्षाचे नेतृत्त्व केले. त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्यावरच भर दिला. २६ डिसेंबर १९०६ रोजी सुरत काँग्रेस अधिवेशनाला श्री अरविंद गेले. तिथे मवाळांचे आधिक्य होते. संपूर्ण स्वातंत्र्य मानावयास ते तयार नव्हते. सुरेंद्रनाथांनी डॉ. राम बिहारी घोष यांचे नांव सुचविले; तर लो. टिळकांनी लजपतराय यांना पाठिंबा दिला. मवाळ लोकांनी लो. टिळकांना हाणण्यासाठी खुर्ची उचलली. एकच गोंधळ माजला. पोलिस पाचारण करावे लागले.

## अलीपूर खटला

उत्तर कलकत्त्यात श्री अरविंदाची माणिकताळा उद्यान नावाची कौटुंबिक स्थावर मालमत्ता होती. तेथे बारीनने क्रांतिकारकांसाठी एक केंद्र स्थापन केले होते. तिथे क्रांतिवादी साहित्य आणि गीता शिकत असत. ध्यानधारणा करीत, तसेच बॉम्ब बनविण्याचे प्रयोगही करीत.

राष्ट्रवाद्यांनी केलेल्या संपूर्ण स्वातंत्र्याचा मागणीमुळे शासनकर्ते फारच भयभीत झाले. पाशवी शिक्षा ठोठावून क्रांतिकारकांना घाबरवून सोडण्याचा खटाटोप त्यांनी आरंभिला. सुशील सेन या पंधरा वर्षे वयाच्या मुलाला किंग्जफर्ड यांनी स्वत:समक्ष फटके देण्याची शिक्षा सांगितली. त्याची शुद्ध हरपून जाण्याइतके फटके दिले. हा अपमान क्रांतिकारकांना सहन झाला नाही. खुदीराम बोस, व प्रफुल्ल चाकी यांनी प्रतिटोला हाणण्याचा निर्धार केला. याचा सुगावा लागल्याने किंग्जफर्ड याने मुझफरपुरास बदली करून घेतली. या युवकांनी त्याचा पाठलाग केला. ३० एप्रिल १९०८ला त्याची गाडी क्लबातून बाहेर पडत असताना तिच्यात साहेब असतील अशा समजुतीने खुदीरामने तीवर बॉम्ब फेकला. श्रीमती केनेडी व तिची कन्या अशा दोन स्त्रिया त्या गाडीतून जात होत्या. त्या मारल्या गेल्या. हे वृत्त समजताच माणिकताला उद्यानातून कार्यकर्ते आणि साधन सामग्री काढून घेण्याची सूचना श्री अरविंदानी बारीनला केली. ती त्याने पाळली. २ मे १९०८ च्या मध्यरात्री उद्यानावर धाड घालून पोलिसांनी बॉंब व शस्त्रे शोधून काढली. बारीन व त्याच्या सहकाऱ्याला अटक केली.

श्री अरविंदावर झडप घालण्याची संधी शासनाला मिळाली. ३ मे १९०८ च्या पहाटेस त्यांच्या घरावर धाड घालून शासनाने त्यांना अटक केली. घराची पुरी झडती घेऊन त्यांचे व्यक्तिगत लिखाण, पत्रव्यवहार इत्यादी गोळा करून नेले. श्री अरविंद याना प्रथम कालबझार पोलिस चौकीवर व तेथून अलीपूर कारागृहात नेले. ५ मे १९०८ पासून कारागृह जीवन चालू झाले. पुढील वर्षी ६ मे स त्यांची कारागृहातून सुटका झाली.

आरोपींची एकूण संख्या ४९ होती, साक्षीदारांची २०६, कागदपत्रे ४०० नोंदली गेली. बॉंब पिस्तुले, दारूगोळा डिटोनेटर, फ्यूज, विषारी आम्ले, इत्यादी सकट ५००० वस्तू पुरावा म्हणून सादर करण्यात आल्या. माफीचा साक्षीदार बनलेल्या नरेंद्र गोस्वामी या आरोपीला कनईलाल दत्त व सत्येंद्र बोस यानी गोळ्या घातल्या. आणि त्यापायी कनईलालला स्वत:च्या जीवनाचे मोल द्यावे लागले, त्याला कारागृहात फासावर देण्यात आले. बीच कॉफ्ट हे श्री अरविंद व इतरांचा खटला चालविणारे सत्र न्यायाधीश होते. ते किंग्ज् कॉलेजमध्ये श्री अरविंद यांचे साहाध्यायी होते. श्री अरविंदाना दोषी ठरविण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न झाले. श्री अरविंदाच्या बाजूने सुप्रसिद्ध

कायदेतज्ज्ञ चित्तरंजन दास खटला लढवत होते. श्री अरविंदांचे म्हणणे त्यांनी वाचून दाखविले. श्री. अरविंद म्हणाले - ''माझ्या राष्ट्रबांधवाना मी स्वातंत्र्याचे ध्येय शिकविले हे कायद्याच्या विरुद्ध असेल तर मी दोषी आहे. स्वातंत्र्याचे धडे देणे हा अपराध असेल तर तो मी केला हे मला मान्य आहे. केवळ स्वातंत्र्याचे पाठ दिले एवढ्यासाठी मी कायद्याच्या कोणत्याच कलमात सापडत नाही.'' मग दासांचे भाषण झाले. ज्यूरींचा निर्वाळा झाला. बीच क्रॉफ्टने श्री अरविंद निर्दोष आहेत असाही निकाल दिला. इतराना शिक्षा झाली आणि त्यांची सुटका १९२० साली झाली.

## सनातन धर्म हाच आपला राष्ट्रवाद

अलीपूर अभियोगातून निर्दोष सुटल्यानंतर श्री अरविंदांच्या इहलोकातील कामगिरीचा नवा अध्याय चालू झाला. मानव जातीच्या दास्य मुक्तीची पूर्व सिद्धता करुन ठेवायला हवी आहे असा आंतरिक आदेश त्यांना मिळाला. कारावासातून सुटल्यानंतर त्यांनी पहिले व्याख्यान उत्तर पाड्यात दिले. ते म्हणाले, 'राष्ट्रवाद हा एक संप्रदाय, एक धर्म, एक निष्ठा आहे, असे मी यापुढे म्हणणार नाही. मी म्हणतो, सनातन धर्मच मुळी आमचा राष्ट्रवाद होय. हिंदू राष्ट्र, सनातन धर्म घेऊनच जन्माला आलेला आहे. व ते त्याच्या सह वाटचाल करीत आहे. व त्याच्या संमतीने वृद्धिंगत होत आहे. सनातन धर्माची अवनती होते तेव्हा हिंदू राष्ट्र ही अधोगतीला जाते आणि सनातन धर्माचा विनाश शक्य असेल तर त्याच्या जोडीने हिंदु राष्ट्रही विनाश पावेल. सनातन धर्म म्हणजेच राष्ट्रवाद. तुम्हाला हाच माझा संदेश'

## योग

योग म्हणजे ज्ञान किंवा कर्म यासाठी सर्वज्ञ व सर्वशक्तिमान अशा तत्त्वांशी योगी साक्षात संबंध साधीत असतो. तो अनंताच्या सुरात सूर मिळवितो, आपल्या सत्वाचा औदार्यद्वारा किंवा उपकारशीलद्वारा जगाला पुरवठा करण्यासाठी योगी स्वत:च परमेश्वराच्या शक्तीचा वाट बनतो. स्वत:वरील अहंची कात टाकून उन्नती साधतो. इतरांसाठी इतरांच्याच सुखदु:खांनी जगत राहतो. भक्तिपूर्वक आणि उत्साहपूर्वक संपूर्णतया कार्यरत राहून तो फलाची चिंता टाकून देतो. जया विषयी उदासीन, पराजयाविषयी निर्भय असतो. स्वत:ची सारी कर्मे ईश्वराला समर्पण करतो. स्वत:चे अमरत्व व मृत्यूचे असत्यत्व याची त्याला जाणीव होते. मन अशांती, दु:ख, खोटाभाव आणि प्रक्षोभ याच्याही अतीत होते, तोच योग होय.

प्राणायाम, आसने, एकाग्रता, अर्चन, विधिअनुष्ठान या गोष्टी स्वत:च योग नव्हेत, ती योग मार्गावरची साधने आहेत. हा मार्ग क्लेशकारक किंवा भयावह मुळीच नाही. योग साधना साधारणत: सर्वच मानवाना शक्य असते. कारण श्रद्धा व भक्ती प्रत्येकाच्या ठिकाणी थोड्याफार प्रमाणात असतेच. सर्वजण योग शिखरावर पोचू शकत नाहीत, पण थोडीफार प्रगती सर्वजण करु शकतील. मानव जितका प्रगत होतो त्या प्रमाणात त्याला शांती, शक्ती आणि आनंद याचा लाभ होत असतो. (स्वरुपमप्यस्य धर्मस्य त्रायोमहतो भयात्। गीता) परमार्थ साधना ही जीवनापासून विभक्त झालेली गोष्ट मानणे चुकीचे आहे. सर्वस्वाचा आनंद अनुभवण्यासाठी सर्वस्वाचा त्याग कर (तेन व्यक्तेन भुंजीथा:) कोणाच्या धनाची अभिलाषा करु नकोस (मा गृध: कस्य स्वित् धनम्) अशी शंभर वर्षे जगण्याची इच्छा बाळग (जिजीविषति् शतं समा:।) स्वत:च्याच कर्माच्या बंधनातून मुक्त होण्याचा दुसरा कोणताही मार्ग तुला लाभलेला नाही. (तान्य: पन्था: विद्यते अयनाय।) लढ व विरोधकांना उखडून टाक. माझे स्मरण कर आणि लढ (मां अनुस्मर युद्धयत।) परमार्थमय झालेल्या, वासना आणि हाव यापासून मुक्त असलेल्या अंत:करणाने तुझी कर्मे अर्पण कर. (मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्म चेतसा। निराशी: निर्ममोभूत्वा युध्यस्व विगतज्वर:।) तुझ्या मनातील सारा विषय तुझ्या पासून दूर जाऊ दे (यस्य सर्वे समारंभा: कामसंकल्प वर्जिता:।)

बडोद्याला योग विद्येचा श्री अरविंद यानी प्रारंभ केला. ते त्यांचे जीवन कार्य होऊन बसले. मूलभूत टप्पे - आकांक्षा, आत्मनिवेदन व त्याग. प्राणायामाच्या अभ्यासाला इ.स. १९०४ पासून प्रारंभ केला होता. ते अनुभव कथन करताना म्हणतात, 'अनेक दृश्यांचे व आकृतीचे साक्षात् दर्शन मला घडत असे. मस्तकाभोवती मला विद्युत्‌शक्ती जाणवे. माझी लेखनशक्ती उसळून आली. गद्य व पद्य प्रवाही शैलीत लिहिता येऊ लागले. आरोग्याबाबत मी धट्टाकट्टा बनलो. माझी त्वचा नितळ गोरी झाली. माझ्या लाळेत माधुर्य स्रवू लागले व माझ्या मस्तकाभोवती एक प्रकारचे चैतन्य वलय जाणवू लागले.'

'एक नाग संन्यासी आले. त्यांनी मला काही स्तोत्र दिले. जहि (तू मार) या शब्दाने युक्त असलेले ते रौद्र स्तोत्र होते. मी ते वरचेवर म्हणत असे, विशेष काही लाभ झाला नाही. ब्रह्मानंदांच्या मृत्यूनंतर केशवानंदांच्या उपस्थितीत मी गंगानाथाकडे गेलो. याच वेळी मी मांसाहार वर्ज्य केला. शरीर खूपच हलके वाटू लागले. चित्तशुद्धी अनुभवास आली.

'मी मूलत: अश्रद्ध होतो. एकदा मी चांदोदजवळ कर्नालीस गेलो. तिथे खूप देवळे आहेत. कालीचेही एक मंदिर आहे, त्या मूर्तीचे मी दर्शन घेतले. तिचे जिवंत सान्निध्य मला जाणवले. देवाच्या सान्निध्यावर प्रथमच विश्वास बसला. काश्मीरात फिरतीवर गेलो असता शंकराचार्यांच्या डोंगराला भेट दिली. तेथे मला अत्यंत गोचर स्वरुपात शून्य अनंताचा अनुभव आला, अद्वैत कवितेत तो वर्णिला आहे.'

''कालाच्या सीमेवर दिसले अनंत सामोरे। निराकार एकान्त पसरला होता मजभवते।

बनले होते अद्‌भुत आणि अनाख्येय सारे। अजात सत्यचि तेच एकले विश्वदस गळाले।

नणते शिखरहि, तळही नव्हता, स्तब्ध नित्य ठेले। सत्यत्वाचा शब्द एकला शांतिरुप साचा।

अज्ञान असे आदि ज्याच्या नि:शब्दचि वाचा। एकाकी निश्चयता शांती अविकारी शून्य।

मूक शिखेवर गूढ गहन करि प्रकृतीच्या धन्य।''

अमरकंटक पर्वत राजीत असताना बारीनला पर्वतीय ज्वराने गाठले. एका नाग साधूने मंत्र घातले व तो हटवला. तेव्हा रोग बरे करण्याचे सामर्थ्य योगात असल्याचे प्रत्यक्ष श्री अरविंदाना जाणवले.

१९०५ साली श्री अरविंद यांनी पत्नीला एक पत्र लिहिले. ''यातना ह्या साऱ्या ऐहिक कामनांचा अटळ परिणाम होय. श्री अरविंद म्हणतात, माझी तीन वेडं आहेत. १) जे काही सद्‌गुण नैपुण्य उच्च शिक्षण, ज्ञान आणि वैभव मला देवाने दिलेले आहे त्यावर त्याचीच सत्ता आहे, असा माझा दृढ विश्वास आहे. कुटुंब पोषणाकरता अटळ निकडीच्या वस्तूंसाठी अवश्य असेल तेवढेच त्यातून वेचण्याचा मला अधिकार आहे.

२) देवाच्या अस्तित्वाचा साक्षात प्रत्यय मला यायलाच हवा. मग तो कोणत्याही साधनाने असो. ईश्वराचे अस्तित्व अनुभविण्याचा, त्याचे सान्निध्य साधण्याचा एखादा मार्ग असलाच पाहिजे, तो कितीही खडतर असो तो अनुसरण्याचा पक्का निर्धार मी केला आहे. हा मार्ग स्वत:च्या आत्म्यात अंतरंगात असतो. ते सामर्थ्यही मला देण्यात आलेले आहे.

३) स्वदेशाकडे मी माता म्हणून पाहातो. माता म्हणूनच तिची पूजा भक्ती करतो. मातेच्या मुक्ततेसाठी धावून जाणे हे आवश्यक. अध:पतित लोकांचे उन्नयन झाले पाहिजे; ते सामर्थ्य शारीरिक नाही. तलवारीच्या वा बंदुकीच्या बळावर नाही, तर ज्ञानाच्या बळावर. त्यात सत्याचे सामर्थ्य असते.

१७ फेब्रुवारी १९०७ रोजी पाठविलेल्या पत्रात त्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात परमेश्वरी इच्छेपुढे

स्वीकारलेली संपूर्ण शरणागती व्यक्त केली आहे. मृणालिनी देवी डिसेंबर १९१८ मधे पाँडीचेरीचा वाटेवरच दिवंगत झाल्या.

१९०७ डिसेंबर - आपल्याला योग साधनेत साहाय्य करू शकेल अशा कोणाची तरी आपली गाठ घालून देण्याविषयी श्री अरविंदानी बारीनला सांगितले. कै. विष्णू भास्कर लेले या महाराष्ट्रीय योग्याचे नाव बारीनच्या कानावर आले होते. त्यांनाच त्याने बडोद्याला बोलावून घेतले. सरदार मुजुमदारांच्या वाड्यात वरच्या मजल्यावरील खोलीत श्री अरविंद श्री. लेले यांच्या समवेत तीन दिवस राहिले.

श्री. लेले म्हणाले, खाली बसा, डोक्यात प्रवेश करणारा प्रत्येक विचार बाहेर ढकलून द्या. श्री अरविंद खाली बसले. त्यांना डोक्यात येणारा प्रत्येक विचार दिसू लागल्याने बाहेर ढकलू शकले. एकाच दिवसात त्यांचे मन शाश्वत शांतीने भरुन गेले. निःशब्द, निष्काम व अनंत ब्रह्माचाच तो साक्षात्कार होता. श्री अरविंदाचा योग तीन वा चार महान् साक्षात्कारांवर उभारलेला होता. त्यातला हा पहिला. या पहिल्या साक्षात्कारा प्रारंभी हे जग संपूर्णतया आभासमय असल्याच्या अत्यंत प्रबळ अशा जाणिवेची जोड होती, ती जाणीव अलीपूर कारागृहातील दुसऱ्या साक्षात्कारानंतर नाहीशी झाली. सर्व प्राणी व अस्तित्वात असलेले सारे वस्तुजात म्हणजेच परमेश्वर व विश्वव्यापी संवित्ती (जाणीव) असल्याचा अनुभव त्या साक्षात्कारात आला.

श्री लेले यांच्या बरोबर ध्यान करुन मनाच्या शांत अवस्थेचा साक्षात्कार घडल्यानंतर १९०८च्या पुढचे लेखन करणे, व्याख्यान देणे, या सारखे कार्य व साऱ्या चळवळी मनातील अशा उगमातूनच उद्भवत असत.

१९०८ ला श्री अरविंद मुंबईला गेले. या अवस्थेत त्यांच्या मनात एक देखील विचार शिरत नसे. तिथे त्याना नॅशनल युनियन मध्ये व्याख्यान द्यावयाचे होते. आणि श्री. लेले यांना त्यांनी विचारले मी काय करु? श्री लेले, म्हणाले "सभेला जा. श्रोत्याला नारायण मानून नमस्कार करा. मग एक अज्ञात वाणी भाषण करील." भाषण खरोखरी तसेच स्फुरले. श्री. लेले यांचा निरोप घेण्यापूर्वी श्री अरविंदानी त्यांना उपदेश देण्याची विनंती केली. श्री. लेले त्यांना उपदेश देत असताना आपल्या हृदयात स्फुरलेल्या मंत्राची माहिती श्री अरविंदानी लेले याना दिली. श्री लेले म्हणाले - तुला ज्यांनी मंत्र दिला त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून रहा. अधिक उपदेशाची काही आवश्यक्ता नाही. त्यानी आपल्याला दैवी अंतरातील गुरूवर सोपविले. एकामागून एक अशी अनुभवाची जोड मिळवीत अधिकाधिक उन्नतिप्रत पोहोचत शेवटचे स्थान म्हणून कुठेही न थांबता उन्नतीचा कवडसा दिसेपर्यंत पुढे पुढेच जात राहण्याची आज्ञा माझ्या अंतरंगातील दैवी गुरूने मला केली आहे, असे श्री अरविंद म्हणाले.

## अलीपूर कारावासातील साक्षात्काराविषयी वर्णन

ईश्वराने माझ्या बंदिपालाची हृदये मजकडे वेळोवेळी आणि काराध्यक्ष असलेल्या इंग्रजाला त्यांनी सांगितले. एकान्त वासाच्या शिक्षेत त्याना क्लेश होत आहेत. त्यांना सकाळ संध्याकाळ अर्धा अर्धा तास निदान त्यांच्या कोठडीबाहेर तरी फिरू द्या. तेव्हा अशी व्यवस्था झाली. ईश्वराचे सामर्थ्य माझ्या ठायी प्रविष्ट झाले. ते तसे फिरत असतानाच मला मानवापासून दूर एकान्तात ठेवणाऱ्या त्या कारागृहाकडे मी पाहिले आणि मग मला वाटले आपल्याला या कारागृहाच्या भिंतीने बंदिस्त केले नसून आपल्याला वेढून टाकले आहे. ते तर वासुदेवाने. मी तर आपल्या कोठडीसमोर झाडाच्या फांद्या खालून हिंडत होतो, पण ते झाड नसून वासुदेव असल्याचे मी जाणून होतो. मला त्या ठिकाणी दिसला श्रीकृष्ण. तो मजवर प्रेमाची पाखर घालतो. मी कोठडीच्या दाराकडे तेथील गजाकडे पाहिले तिथेही मला वासुदेव दिसला.

कारागृहात माझ्या एकान्त ध्यानात माझ्याशी संभाषण करीत असलेली विवेकानन्दांची वाणी मला सतत दोन आठवडे ऐकू येत असे व उपस्थितीही जाणवत असे.

या अवधीत श्री अरविंदांचा जीवन विषयक दृष्टीकोनात आमूलाग्र परिवर्तन घडून आले. आध्यात्मिक शक्ती व उत्साह आणि ईश्वरी मार्गदर्शन यांची जोड स्वत:च्या जीवन कार्याला मिळावी म्हणून त्यानी योगाचा मार्ग अवलंबिला होता. पण आता त्यांच्या आंतरीक आध्यात्मिक जीवनाचे आणि साक्षात्काराचे परिणाम आणि व्याप्ती निरंतर वृद्धिंगत होऊन अधिकाधिक विस्तृत क्षेत्र आक्रमू लागली. आणि या गोष्टींनी त्याना पुरते झपाटले. त्यांचे जीवन कार्य हाही त्याच्याच अंश व परिणाम होऊन गेला. हे कार्य राष्ट्राची सेवा आणि विमोचन याहून कितीतरी अधिक व्यापक असून ते पूर्वी ओझरतेच दिसलेल्या परंतु विश्वव्यापी आकांक्षेशी निगडित असलेल्या व उभ्या जगावर परिणाम घडविणाऱ्या अशा ध्येयावर केंद्रित झालेले होते. सारे जीवनच योग होय, हे अरविंदांच्या संदर्भात स्पष्ट झाले होते.

कर्मयोगीन् व धर्म नावांची दोन साप्ताहिके कारागृहातील अनुभव बंगालीत प्रकाशित करीत. त्यातूनही या गोष्टी प्रसारित केल्या. ही दोनही साप्ताहिके लोकप्रिय होती व मोठ्या प्रमाणात त्यांचे वितरण होत असे.

कर्मयोगीन् मधे श्री अरविंद म्हणतात, - 'आता आम्हांपुढे ठेवलेले कार्य केवळ यांत्रिक नव्हे तर नैतिक आणि आध्यात्मिक आहे. आमचे उद्दिष्ट केवळ शासनाचे स्वरुप पालटून टाकणे हे नसून राष्ट्राची उभारणी करणे हे आहे. आम्ही वाहून घेणार ते केवळ राजकारणाला नव्हे, नुसत्या सामाजिक समस्यांना नव्हे, एक एकट्या धर्म शास्त्राला, साहित्याला, विज्ञानाला नव्हे, या साऱ्यांची गणना धर्मात असण्याची आमची श्रद्धा आहे. त्या राष्ट्रधर्म नामक सलग प्रणालीत करतो या जीवनाची एक अत्यंत प्रभावी अशी नियमावली आहे, हा धर्म सनातन व शाश्वत असा धर्म आहे. आपण परत वळून जीवन व शक्ती यांचे मूळ स्रोत स्वत:च्या अंतरात्म्यातच शोधायला हवेत. आपण स्वत:चा भूतकाळ जाणून घ्यायला हवा आणि स्वत:च्या भविष्यासाठी तो परत प्राप्त करुन घ्यायला हवा. प्रथम स्वत:चे यथार्थ स्वरूप जाणून घेऊन प्रत्येक गोष्टीला भारताच्या प्रकृतिनुसार व शाश्वत जीवनाच्या व्यवहारानुसार आकार देणे हे आपले कर्तव्य आहे. आमची अशी श्रद्धा आहे की आज भारताचे उत्थान घडून येत आहे. योग हेच मानवी जीवनाचे ध्येय बनावे यासाठी स्वत:च स्वातंत्र्य ऐक्य आणि महात्म्य प्राप्त करून घेण्याची शक्ती भारताला योगातून मिळेल. तसेच ते टिकवून ठेवण्याची क्षमताही योगानेच लाभेल. आम्हाला भविष्य दिसते आहे. ते आध्यात्मिक क्रांतीचे. भौतिक क्रांती ही तिची नुसती छाया असेल.'

कर्मयोगीन् मधे श्री अरविंदानी खूप लिखाण केले.

**आदेश -**

ब्रिटिश लोकांचा स्वभाव व गुणविशेष आणि त्यांच्या राजकीय मनोवृत्तीचे वळण यांचा श्री. अरविंदानी अभ्यास केलेला होता. भारतीय जनतेने चालविलेल्या आत्मविमोचनाच्या कोणत्याही प्रयत्नाला ते विरोधच करतील व आपले साम्राज्य दुर्बळ होणार नाही अशा सुधारणांना हळुवार मान्यता देतील. मात्र ते टोकाला जाऊन निर्दयपणे हटून रहाणार नाहीत. स्वातंत्र्य हिसकावून जाण्यापेक्षा ते स्वत:हून आनंदाने देतील.

१९०५ नंतर लॉर्ड कर्झन नंतर लॉर्ड मिन्टो हे भारताचे गव्हर्नर जनरल झाले. हे परंपरावादी होते. भारत मंत्री जॉन मोर्ले उदारमतवादी, लॉर्ड मिन्टोला लॉर्ड मोर्लेने एक पत्र लिहिले होते. ते इंग्लिश व्यक्तिमत्वाचे निदर्शक आहे. त्यात त्यांनी लिहिले आहे - हिंदुस्थानच्या शासन कर्त्यांना आजच्या परिस्थितीकडे डोळेझाक करता येणार

पृष्ठ क्र. १४ वर

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा लेख, विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

## पार्श्वभूमी

दिशा मासिकांत गेले दोन वर्षे, मी ह्याच शीर्षकाखाली जी लेखमाला लिहीत गेलो, त्यामध्ये कांही बांधेसूद मांडणी करण्याचा प्रयत्न फार मोठा नव्हता; तर ''भारतीय संस्कृती,'' ह्या संकल्पनेचा जो वारंवार 'उच्चार' ह्या जगांत केला जातो, त्या संस्कृतीचे खरे बीज ''वैदिक ज्ञानात - किंवा वेदांनी व्यक्त केलेल्या, सुचवलेल्या वैश्विक सत्यावर व आशयावर आधारलेले आहे, असे ठासून मत व पुरावे मांडणे हा होता.

## वेद बीजातले अनंतत्व

ह्या वेद बीजात जी अनंत काळपर्यंत पुनःपुनः व्यक्त होणारी सृजन शक्ती आहे, त्या जोरावर 'भारतीय संस्कृती', ह्या भारतभूमीवर किंवा पृथ्वीतलावर, गेले कित्येक युगे स्थानापन्न आहे व आजही जिवंत आहे - ही आहे या बीजाची ताकद!!

## Vedic Technology

ह्या ताकदीच्या मागे जी तंत्र, मंत्र, यंत्र, योग, समाधी, कुंडलिनी जागृती साधने आहेत, त्यांचाही उल्लेख व तोंड ओळख करण्याचा छोटा प्रयत्न मी केला आहे.

ह्या प्रयत्नात पाश्चात्य भौतिकवादी विज्ञानही आपल्या पद्धतीने कसे वेदांच्या दृष्टीकोनाला पुष्टि देत आहे किंवा त्या वैदिक निर्देशिलेल्या वैश्विक सत्याकडेच वाटचाल कसे करत आहे, हे ही जाताजातां सांगत गेलो आहे.

## वैदिक संकल्पना

दिशाच्या कांही शेवटच्या लेखात 'यज्ञ' ह्या वैदिक संकल्पनेवर कांही नूतन पुनरुज्जीवन करण्याच्या हेतूने मी मांडणी केली आहे व 'यज्ञ' संकल्पनेचा, जो त्यातील आध्यात्मिक व रहस्यात्मक आशयाचा व योजनेचा 'लोपलेला' - नाहीसा झालेला भाग, त्यावर जाणिवपूर्वक बोट ठेवण्यासाठी प्रयत्न केला आहे.



चित्र नं. १

## भारतीय संस्कृती व यज्ञ

पण, त्याचबरोबर 'भारतीय संस्कृतीत' जो 'यज्ञ संस्कृतीचा' मोठा भाग आहे किंवा 'आधार' आहे. त्याचाही उल्लेख करावयालाच हवा. त्या दृष्टीने आज या लेखात आपण कांही विचार तपासणार आहोत.

**विश्वनिर्मीती Creation**

सगळे जग संपूर्ण मानवी समाज - गेले कित्येक युगे ह्या पृथ्वीवरच्या जीवनाचा उगमाचा, निसर्गाचा संरचनेचा, त्याच्या घटकांच्या आपआपसात असलेल्या नात्याचा व मुख्य म्हणजे ह्या भौतिक जगाच्या निर्मितीच्या गूढ सत्याला जाणण्याचा प्रयत्न, सुरवातीला ख्रिश्चन, इस्लाम धर्मातील 'प्रॉफिटच्या' ज्ञानावर आधारून व नंतर त्यांतील फोलपणा पटल्यावर, आधुनिक वैज्ञानिक शास्त्रावर आधारून, करुं पहात आहेत. पण, जरी ह्या वैज्ञानिकांना सृष्टीच्या भौतिक अस्तित्वातील कांही दर्शनं व सिद्धी प्राप्त झाल्या, तरी ह्या विश्वाच्या उगमाबद्दल व या सृजन प्रक्रियेचा क्रियेबद्दल ते अजुनही 'अनभिज्ञच' आहेत. पण, तरीही त्यांच्या सांप्रदायिक विज्ञान पद्धतिवर त्यांचा एकांगी व आग्रही विश्वास आहे.

**हिंदू विश्वास**

ह्याच्या उलट वैदिक तत्त्वज्ञानावर 'विश्वास' ठेवणाऱ्या 'हिंदू भारतीय समाजाला' विश्वनिर्मीती व विश्वरचनेचा पूर्ण आराखडा वेद व उपनिषदे ह्यांनी दिला आहे व त्यांतील तार्किकता पटत असली तरीही वैश्विक प्रत्यक्ष 'क्रियेची साक्ष' व 'प्रत्यक्षीकरण' पूर्ण समजलेले नाही अवगत नाही व प्राप्त झालेले नाही. हे अजूनही गूढ स्वरुपांतच रहाणार, इथेच त्यांचे विश्वास सध्यातरी विसावलेले वा थांबलेले आहेत!!

ह्या वैदिक ज्ञानाच्या स्तुतीमध्ये व महतीमध्येच व गुणगानामध्येच, ते पूर्णपणे रमलेले आहेत. ह्याचे मुख्य कारण म्हणजे हे जाणण्याकरिता जी तपस्या व संकल्प लागतो त्याचा अभाव. दूसरे मुख्य कारण, पाश्चात्य भौतिक विज्ञानाच्या अपूऱ्या पण 'अंशत: प्रत्यक्षीकरणाच्या' दर्शनाने विश्वासात झालेला 'भौतिकवादी बदल'. ह्या एकांगी भौतिकवादातून 'आध्यात्मिक रहस्य' समजणे अशक्य आहे.

मला ह्या सर्व परिस्थितीची जाणीव झाल्यावर जबरदस्त खंत वाटली व ह्याचा शोध घेण्याच्या प्रयत्नाची ओढ वाटू लागली.

**यज्ञ मूळ संकल्पना**

ह्याच मागोव्यांत 'यज्ञ' ही वैदिक संकल्पना विशेषत: अत्यंत समर्पकपणे पण सूचकपणे ही 'पुरुष सुक्तांत' मांडली गेली आहे. हे उमगले व पटले. पण, प्रचलित हिंदू समाजात 'पुरुषसुक्त' हे केवळ धार्मिक हृदयाने व विश्वासाने पारायण व पठण करण्याच्याच पातळीवर आचरले जाते, हे दिसले!! गणेशपूजेच्या धार्मिक विधी किंवा कर्मकांड (बहिर्गत आचार), एव्हढ्या मर्यादित स्वरुपांत 'षोडशोपचार पूजेच्यां, प्रत्येक १६ संस्कारात एक एक ऋचा 'पुरुषसुक्ताची' कोरडेपणे म्हणावयाची, एव्हढाच आचार व विश्वास दिसला. पण, ह्या रुढींचा हेतू समजण्याचा प्रयत्न अजिबात दिसत नाही.

**चिरंतन बीज व यज्ञ**

त्यामुळे 'यज्ञ' ही फार मोठी वैश्विक काळांपर्यंत सातत्याने चालण्याच्या चमत्काराची 'बीज संकल्पना' व 'वैश्विक सत्य' आहे. हे हिंदू समाजाला तीव्रतेने जाणवलेले व पटलेले दिसत नाही. एव्हढेच नव्हे तर अनेक पंडितांनी 'पुरुषसुक्ताची प्रक्रिया भाषांतराच्या किंवा रुपांतराच्या किंवा भाष्याच्या स्वरूपांत प्रसिद्ध केली आहे, त्यात, एकतर उघड चुका आहेत, किंवा विकृती आहेत, आणि त्यामुळे ह्या 'यज्ञ' क्रियांच्या प्रत्यक्षीकरणांत मूलगामी संशोधनाची आवश्यकता आहे. हे प्रकर्षाने जाणवले!!

**पुरुषसूक्ताची दिशा**

माणूस आपल्या बुद्धीच्या तोकड्या व क्षुद्र व दूषित नैतिकतेने भारलेल्या अस्तित्वाबद्दल बिलकूल जागा नाही. तरीदेखील त्याच्या अहंकारात तो विश्वाच्या प्रक्रियेच्या जाणण्याबद्दल सतत खात्री बाळगतो आहे. त्याच्या

सध्याच्या पातळीवर - मनाच्या, बुद्धीच्या, कल्पनाशक्तीच्या व इंद्रियाच्या जोरावर हे अशक्य आहे. पाश्चात्य विज्ञानाला हे जाणवले आहे. शिवाय, ह्या भौतिक जगाच्या मुळाशी अव्यक्त जगाच्या बीज, सृजन शक्तीचा जो अदृश्य आधार आहे, त्याबद्दल त्याला अजिबात जाणीव नाही. पुरुषसुक्त मात्र ही जाणीव सूत्र पद्धतीने करुन देते. ही धार्मिक रुढी प्रत्येक पिढीत वारंवार उजळणी देऊनही एका दृष्टीने अयशस्वीच ठरत आहे!!

## दशांगुले पुरुष

ह्या मर्त्य देहात रहाणाऱ्या ह्या मानवी 'क्षर पुरुषाला' ह्या 'दशांगुले पुरुषाला' हे रहस्य आपल्या शरीरांतच आहे हे उमगत नाही!!

हे मानवी शरीर म्हणजे एक अत्यंत प्रभावी, सामर्थ्यशाली ज्ञानशक्तीचे, कल्पनाशक्तीचे, रहस्यात्मक आणि वैश्विक शक्तिचे भांडार आहे - हे माहीत नाही - त्यांतील 'निद्रीत वैश्विक शक्ती' (देवता), त्यांना कार्यप्रवृत्त करण्याच्या पद्धती त्याला माहीत नाहीत. ज्या कांही थोड्या शक्ती (कुंडलिनी, दुर्गा, गणेश, काली, भगवती वगैरे) ह्या निरनिराळे रुढीप्रिय संप्रदाय संभाळत आहेत, त्यांच्याकडे तो कोरडेपणे, निर्विकारपणे, अनुत्सुकतेने, असहानुभूतीने बघत आहे. ह्या साधनांच्या विश्वासार्हतेवर पाश्चात्य संस्कृतीने संशयाचे, साशंकतेचे, अवैज्ञानिक, असत्याचे पडदे उभारलेले आहेत. हा भारतीय हिंदू समाज ह्या अज्ञानी बुरख्यात अडकला आहे!!

पण, जर तो ह्या आसूरी जाळ्यांतून बाहेर पडला, तर त्याच्या लक्षात येईल कीं 'यज्ञ' ह्या क्रियेची जी बाह्य प्रतिकात्मक कर्मकांडी स्वरुपे (निष्प्राण, निर्जीवी) त्याला आजही अस्तित्वात व आचारात दिसताहेत (निदान धार्मिक व्यवहारात) त्यांची बांधिलकी ही त्याचा सूक्ष्म आंतरिक मनाच्या, बुद्धिच्या, अंत:करणाचा प्रक्रियेची जोडलेली आहे. सध्याचे आधुनिक भौतिक विज्ञान ह्याबद्दल अनभिज्ञ आहे.(Collative parallelism)

त्यालाच-म्हणजे त्याच बहिर्गत प्रतिकात्मक स्वरुपक्रिया व आंतरिक प्रत्यक्ष मानसिक, भावनिक बुद्धीगत, व Consciousness मधील क्रिया ह्यांचे नाते बांधलेले आजही हजर आहे - वाट पहात आहे!!

## Act of Imagination यज्ञ मर्म

ह्या जोडणीसाठी लागणारी कल्पनाशक्ती मानसक्रिया जागृत करावी लागणार आहे. ह्यालाच ॲंटोनियो निकोलस "An act of imagination" म्हणतात. ''रूपक तार्किकता'')


## भारतीय संस्कृतीतील शब्द संकल्पना

आपल्या भाषेत ह्या क्रियेला 'संगती करण' असे म्हणतात. काय आहे ही क्रिया ?

पण, ही यज्ञ क्रिया समजण्यासाठी आपल्या भारतीय हिंदू संस्कृतीत ज्या काही महत्त्वाच्या संकल्पना वैश्विक सत्य म्हणून सामावलेल्या आहेत, त्या पुन:प्रत्ययाच्या अनुभूतीवर जाणून घेऊ या. ही जाणीव केवळ शब्दार्थ समजला ह्या स्तरावर नव्हे, तर आपले हृदय, बुद्धी, मन व आत्मा ह्याच्या प्रत्यक्ष अनुभूतीवर आधारलेली असू द्या - कारण हे विलक्षण सत्यच ह्या 'यज्ञसंस्थेच्या आधाराला कारणीभूत आहे.

## भूमी व दान क्रिया

ज्या भूमीवर टाकलेले बीज सहस्त्रपटीने वृद्धिंगत होऊन शेतकऱ्याला, किसानाला ते धान्य स्वरुपांत परत देते ती 'भूमी' ही एक वैश्विक आश्चर्यकारक 'दान' क्रिया करीत असते. असे 'दान' आपली बँक किंवा 'मायाळू सरकारही' करत नाही. ती पैसे किंवा टॅक्सचा एक व्यवहार करते. म्हणूनच भूमि पूज्य आहे - बँक व सरकार नव्हे!!



चित्र नं. २

इथे ते लहानसे 'बीज' हा 'देवोपहार' - देवाचा उपहार आहे. भूमीसंवर्धन ही देवपूजा आहे, कारण 'देवच' फक्त हा वैश्विक 'दान व्यवहार' करतो, मानव फक्त देण्याघेण्याचा संकूचित, स्वार्थावर आधारलेला व्यवहार करतो.

**गो: गाय किंवा किरण**

गाय, चारा किंवा गवत ग्रहण करते व नंतर गोठ्यात स्वस्थ बसून रवंथ वा मंथन करते. पोटांतील 'आमाशय' मधील घास मुखामध्ये पुन्हा पोटात असा गतीशील कार्यक्रम करते. तसे सूर्यापासून, विश्वातून, प्रकृतीकडून येणारे ज्ञान मंथन करण्यास प्राप्त करणे हे मानवी कर्तव्य आहे.

स्वत:च्या मनातील 'पशूभाव' ओळखण्यासाठी निसर्गातील प्रत्यक्ष पशूंचे आचरण, वृत्ती बघून ते वेगळे वेगळे पणे जाणणे व ओळखणे ही क्रिया 'आलंभन' म्हणून संबोधली जाते.

पण, ह्या 'वृत्तीचा' त्याग किंवा स्वीकार वा वर्धन करण्याची क्रिया 'संज्ञपन' ह्या संकल्पनेने हाताळली जाते. त्यामध्ये पशूवृत्तीची गुणशास्त्रानुसार परीक्षा करणे अनुस्युत आहे.

**मेधा संगतिकरण**

धातुपाठांतील 'मेधगु संगमेच' हा धातु 'यज्ञ' ह्या क्रियेला आधारभूत आहे. 'संगतिकरणे' ही ती क्रिया आहे. ही 'परस्पर संम्मीलन' ही क्रिया आहे. इंग्रजीतील synthesis, harmonisation हे शब्द हा अर्थ थोडासा प्रतीत करुं शकतील.

१) प्रत्येक व्यक्तिमध्ये नैसर्गिक पशूभाव जन्मत:च आहे.

२) प्रत्यक्ष सृष्टितील पशूंत जे नैसर्गिक गुण दिसण्यात येतात - याचे 'प्रतीक स्वरुप' जाणून त्याचे **'आलंभन'** करणे व **'संज्ञपन'** करणे हा **'मेधाक्रियेचा'** हेतू आहे.

ह्याचे अगदी ढळढळीत उदाहरण म्हणजे राजकीय बुवाबाजी करणाऱ्या पुढाऱ्याचे ''बकध्यान''!! आतां लक्षात आले असेल कीं हे पुढारी पांढरा झब्बा, धोतर व गांधी टोपीच कां घालतात बरे ? डोळ्यासमोर 'बगळा' आणा. किती समर्थपणे हे **'आलंभन'** व **'संज्ञपन'** मानवी समाजाने आत्मसात केले आहे.!!

त्यामुळे जे त्याज्य असे **'पशुभाव'** आपल्यामध्ये आहेत त्यांना वगळणे, काढून टाकणे व जे अनुकरणलायक किंवा वर्धिष्णू करण्यायोग्य आहेत त्याचे संवर्धन करणे हा 'यज्ञातील' मेधाकरणाचा प्रयोग आहे.

अर्थातच हा प्रयत्न मानसिक, आत्मिक ताकतीवर व कल्पनाशक्ती व योगक्रियेवर आधारलेला आहे. तसेंच ही क्रिया Bio-Cultural-Psychological अशी आहे. साध्या पदार्थ विज्ञानाची इथे असमर्थता आहे. ते उघड आहे. पण म्हणून ती 'सहजशक्य,' 'सहजसाध्य' आहे अशी भोळी समजूत बाळगून चालणार नाही.

ह्याकरिता 'अग्नि' व 'अश्व', उध्र्वरेत, 'सोमयाग' ह्या क्रिया व संकल्पना (वैदिक ज्ञानावर आधारलेल्या) समजून घ्याव्या लागतील.

अगदी थोडक्यात -सूत्र पद्धतीने काहींचे वर्णन करु या. त्याचे प्रत्यक्षीकरण हा संशोधनाचा व प्रायोगीकरणाचा विषय आहे. आज समाज मन ह्या संशोधनाबद्दल जागृत व अनुकूल नाही. ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. पण, तरीही ह्या संकल्पनांचा थोडासा तलास घेऊं या.

## वैश्विक अग्नि

'अग्नि' म्हणजे भौतिक आग नव्हे. ज्वाला नव्हे जाळ नव्हे. भौतिक दृष्टिला ईश्वर, देव दिसत नाही अग्नि दिसत नाही, 'यज्ञकर्म' व 'यज्ञक्रिया (अंतर्गत) दिसत नाही. त्याकरितां 'अंतर्चक्षू' अधिकार प्राप्त करावे लागतात.

## महायोगी अरविंद

महायोगी अरविंद घोष हे आपल्या "Hymns to the Mystic Fire" ह्या जवळजवळ ५०० पानी ग्रंथात अग्निबद्दल काय म्हणतात, ते खचितच उद्‌बोधक ठरेल.

"Agni is a god - He is of the Devas, the Shining ones ......... He is inherrently pure and he is not touched nor soiled by the impurities on which he feeds. He enjoys the play of good and evil and leads, raises or forces the evil towards goodness. He burns in order to purify. He destroys in order to save. When the body of the sadhaka is burned up with the heat of the Tapas (तप), it is Agni that is roaring and devouring and burning up in him the impurity and the obstructions....

Knowledge was born to Agni with his birth therefore he is called Jatvedas (जातवेदा) ऋग्वेदातील पहिली ऋचा आहे.

''अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम्।
होतारं रत्नधातमम्॥१॥

"Agni I adore, who stands before the Lord, the god who sees Truth, the warrier, strong disposer of delight."

Agni (he who excels and is mighty)" cries the seer, "him I adore" why Agni before all the other gods? Because, it is he that stands before Yajna, (यज्ञ) the Divine Master of things; because he is the god whose burning eyes can gaze straight at Truth, at the Satyam, the Vijnanam, which is the seer's own aim and desire and on which all veda is based; because he is the warrior who wars down and removes all the crooked attractions of ignorance and limitation. (as majj ahuranam enah) that stand persistently in the way of the Yogin; because as the Vehicle of Tapas, the pure divine super conscions energy which flows from the concealed higher hemisphere of existence, (avyakta parardha) (अव्यक्त परार्ध) he more than any developes and arranges Ananda, the divine delight. This is the signification of the verse."

हे भाष्य मुळातच देण्याचे कारण म्हणजे श्री अरविंद घोष, हे इंग्लंडमध्ये शिकलेले, I.C.S. परीक्षा पास झालेले, अलीपूर बॉम्ब "Conspiracy" मध्ये तुरुंगवास भोगलेले क्रांतिकारी, त्यांची केस ही बॅरिस्टर चित्तरंजन दास यांनी लढवलेली, कॉंग्रेसच्या संघटनेतील बडोद्याच्या श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या संस्थानात मोठ्या हुद्यावर काम केलेले, श्री. भास्कर लेले ह्या योग्याच्या मार्गदर्शनाखाली योग दीक्षा नंतर स्वत:च्या 'Integral Yoga' व 'Synthisis of Yoga' असे भाष्य लिहीणारे, पॉंडिचरीला प्रत्यक्ष एक स्वतंत्र स्पिरीच्यूअल शहर व आश्रम निर्माण करणारे जगमान्य स्पिरिच्यूअल लीडर होते. त्यांचे तरी योगिक, आध्यात्मिक दर्शन वाचल्यावर उथळ भौतिक वैज्ञानिक शंका घेणे टळावे!!

## प्रतिकातून बोध व क्रिया

त्यामुळे 'यज्ञ' ही केवळ बहिर्गत कर्मकांडी जड क्रिया नसून, त्यांतील प्रत्येक भौतिक वस्तू व क्रिया यांना विशिष्ट व योगिक आध्यात्मिक अर्थ आहे, हे ध्यानांत यावे.

''यजुर्वेदात (१५-५४) एक ऋचा आहे.
उद्बुध्यस्वाग्ने प्रति जागृहि त्वमिष्टापूर्ते
सऽऽ सृजेधामयं च ।
अस्मिन्त्सधस्थे अध्युत्तरस्मिन विश्वे देवा यजमानश्च सीदत ॥''

''(अग्ने) हे परमात्माग्नि, तू (उद्बुध्यस्व) उद्बुध्द हो, (प्रतिजागृहि) मेरे हृदय मे जाग। (त्वम्) तू (अयंच) और यह मेरा आत्मा, दोनो मिलकर (इष्टापूर्ते संसृजेधाम्) इस उत्कृष्ट हृदयरुप यज्ञमंडप में (विश्वे देवा:) सब इंद्रियरुप देव (यजमानश्च) और आत्मरुप यजमान (सदित) आका बैठो।

**इष्टि, पूर्ति व छिद्र**

डॉ. रामनाथ वेदालङ्कार, विद्यामार्तंड, एवं संस्कृत विभागाध्यक्ष, गुरुकुल कांगडी विश्वविद्यालय हरिद्वार. पूर्व आचार्य एवं अध्यक्ष, महर्षि दयानंद वैदिक शोधपीठ, पंजाब विश्वविद्यालय, चंडीगढ हे म्हणतात:

''तो भी यहाँ आत्मिक अग्निहोत्र मे हमें मुख्य रुप से अपने शरीर के अंदर होनेवाले 'इष्ट' और 'पूर्त' को देखना है।''

''हमारा यह शरीर देवों की पुरी है।
**अष्टाचक्रा नवद्वारा देवानां पूरयोध्या॥**
**अथर्व १०.२.३१**

इस शरीर में सब देव वैसे ही अवस्थित है,
जैसे गौएँ गोष्ठ मे स्थित होती हैं ''
**'सर्वा अस्मिन देवता गावो गोष्ठ दूवासते॥**
**अथर्व ११.८.३२**

''मन, बुध्दि, प्राण, ज्ञानेंद्रियाँ आदि ही शरीर के देव है। इन सबसे हम जो कुछ भी क्रियाएँ करते हैं, उन सबको हमें यज्ञमय बनाना है। इस प्रकार मनन, चिंतन, प्राणन, दर्शन, श्रवण, गमन आदि अपनी सभी क्रियाकों हमें 'इष्टि' का रुप देना है।

इसी प्रकार हमें अपने शरीर में क्षीण होती हुई शक्तियों को **पूर्ण** करना है। जो हमारे अंदर अनेक **छिद्र** (दोष) हो रहे है उन्हे भरना है, जैसा कि यजुर्वेद मे कहा है -

**यन्मे छिद्रं चक्षुणो हृदयस्थ मनसो वातितृष्णं**
**बृहस्पतिर्मे तद्धातु। शं नो भवतु भूवनस्य यस्पति:॥**
**यजुर्वेद ३६.२**

''अर्थात जो मेरी आँख का, हृदय का या बुध्दिका छिद्र या दोष है, जो बहुत बडा होता जा रहा है, उसे बृहस्पति प्रभू भर देवे। इस प्रकार वह भुवनपति परमेश्वर हमारे लिए मंगलकारी हो।

यही हमारे अंदर का **'पूर्त'** है । त्यामुळे ही 'प्रतिक' व आत्मिक यज्ञामधील नाते संकल्पना काय आहे, ते नमूना म्हणून पाहू या.

**हृदय** ही **यज्ञशाला** आहे.

ह्या आध्यात्मिक यज्ञात 'होता' कार्य 'वाणी' करते. चक्षु हे अध्वर्यु, प्राण हा उद्गाता, मन, ब्रह्मा हे चार ऋत्विज होत.

वाणी 'होता' बनून सूक्ष्म रुप घेऊन परमात्माग्नि चे स्तोमपाठ करुन आवाहन, जागृती करते. प्राण उद्गाता बनून सामगान करतो वगैरे वगैरे आणि मग हा 'पुरुष यज्ञ' पार पडतो.

इथे **'घृतं'** हे **'रेत'** (Semen) असते. **'अस्थि'** ह्या समिधा असतात. पण हे कल्पनाचित्र माणसाच्या अंतरंगात अत्यंत गूढ अशी पण विश्वात सत्य असलेली क्रिया करुन आपल्या कॉंशसनेसची सात्विकता व उंची वाढवतात. ह्या यज्ञाचीच स्वरुपे गोमेध, अश्वमेध, पुरुषमेध वगैरे आहेत. ह्या प्रत्येक संकल्पनेत अश्व, गो, पुरुष यांना आध्यात्मिक स्वरुपे व अर्थ आहेत. हे सर्व एका लेखात सांगणे कठीण आहे पण, ह्या सगळ्या प्रकारांत जी गोष्ट

प्रामुख्याने मांडावयाची आहे ती ही कीं ह्यातील सगळ्या प्रयोगांचा हेतू 'यज्ञक्रियेने' एक मानवी किंवा वैश्विक Consciousness मध्ये एक उच्च सुसंस्कृत, सात्विक पातळी उंचावणे हा आहे.

## वैदिक शोध

तसेच ह्या क्रियेसाठी जी वैश्विक सत्य, प्रत्यक्ष क्रियांचा (Cosmic existing Processes) वापर करण्यात येतो, हा भारतीय संस्कृतीचा मोठाच एक वैदिक ज्ञानाचा, संशोधनाचा, तंत्राचा, हेतूंचा वारसा आहे. हा वारसा केवळ भारतीय न रहाता तो वैश्विक, जागतिक व्हावा हा हेतू 'कृण्वन्तो आर्यम्' ह्या घोषणेत आहे.

## बुद्धटीका

शिवाय जरी या 'यज्ञ' संकल्पनेचा आजच्या मितीला एक अर्धवट, अजाण किंवा विकृतही स्वरुपात बदल झालेला दिसत असेल, तरीही ही मूळ वैदिक कल्पना व क्रिया किंवा आचार हा आजही एक दिव्य संस्काराची योजना व संकल्पना असाच आढळेल. ह्या 'यज्ञ' क्रियेची जी अधोगत अवस्था बुद्ध (पूर्व) काळात अस्तित्वात होती व टीकेला प्राप्त झाली. ती जरी योग्य मानली, तरीही त्यानंतर आजच्या क्षणालाही या यज्ञ संकल्पनेकडे जे भारतीय संस्कृतीत दुर्लक्ष झाले आहे, ते खेदजनक आहे.

## यज्ञाचे भविष्य

ह्या लेखाचा उद्देश ह्या यज्ञ संकल्पनेचे पुनरुज्जीवन, पुनर्स्थापनेचा प्रयत्न व संशोधन व्हावे हाच आहे. ही सुबुद्धी भारतीय मनाला व्हावी हीच प्रार्थना.

यशवंत साने
सोनल अपार्टमेंट,
अम्बारी लेन, ठाणे
टे. नं. २५३६ ८४५०
E-mail : yrsane@eth. net

पृष्ठ क्रमांक ७ वरून

## योगी श्री अरविंद (लेखांक तिसरा)

नाही. राजकीय वातावरण पार पालटून गेलेले आहे. समस्या डावलण्याजोग्या नाहीत. उत्तर शोधण्याचा प्रयत्न करावाच लागणार. आणि आपणाकडूनच त्याचा प्रारंभ व्हावा. या देशातल्या चळवळीमुळे हिंदुस्थानाच्या राज्यकर्त्यांना या गोष्टी करणे भागच पडेल. इंग्लंडच्या राजेसाहेबापुढे आपली मते मांडण्यासाठी प्रथमच पुढे झाले पाहिजे त्यांच्या उभयतांच्या मते श्री अरविंद भयंकर पुरुष होता.

बारीसाल मधील प्रत्येक परिषदेला उपस्थित राहून श्री अरविंद यानी व्याख्याने दिली. शासनाने त्यांना देशांतून निष्कासित करण्याचे ठरविले होते. ही माहिती भगिनी निवेदिता यांना मिळाली. त्या स्वत: क्रांतिकारक असून श्री अरविंदांशी संपर्क साधून होत्या. त्या उभयतांची भेट बडोद्याला १९०२ साली झाली. १९०३ साली बंगाल मध्ये क्रांतिकार्य चालू ठेवणाऱ्या सदस्यांपैकी त्या एक होत्या. श्री अरविंदांनी हिंदुस्थान सोडून जावे व बाहेरून कार्य करावे असे त्यांना वाटत होते. २५ डिसेंबर १९०९ रोजी देश बांधवाना एक अनावृत पत्र कर्मयोगिन् मध्ये लिहिले. त्यात त्यांनी आपणाला देशाबाहेर काढले जात असल्याचा स्पष्ट उल्लेख केला. हे आपले शेवटचे प्रतिज्ञापत्र असल्याचे सांगून ते देशाला अर्पण केले.

(क्रमश:)

- शं.बा.मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

चित्रपावली

# या चित्रांमागे दडलंय् काय ?

*चित्रकला विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्या दृष्टीने दिशाने ही लेखमाला प्रसिद्ध केली. लेखमालेतील हा लेख - संपादक*

काही मुलांना एकसारखे अभ्यास एके अभ्यास नाही आवडत. हाताने काहीतरी चाळे करणे, निर्मिती करणे ही त्यांची सहजप्रवृत्ती. या निर्मितीक्षम मुलांना एका चौकटीत राहणे पसंत नसते. त्यामुळे त्यांना समजून घेण्यासाठी कलामाध्यमच हवे.

इयत्ता १० वीच्या वर्गातल्या मुलाचा विकास पहा. हा विद्यार्थी एके दिवशी चित्रकलेच्या तासाला आला तो हिरमुसला होऊन, काय झाले, ते विचारल्यावर तो म्हणाला, 'तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी माझी चित्रे माझ्या अभ्यासाच्या खोलीत भिंतीवर लावली. ती पाहून मी सुखावलो. माझा अभ्यासही व्यवस्थित होत असे. पण एक दिवस बाबांनी ती पाहिली आणि म्हणाले, 'अवलक्षणी कार्ट मेलं. नुसतं चित्रं काढतंय त्यापेक्षा गणितं सोडव, इंग्रजी कर. चित्र काढून काय पोट भरणारं आहे का ?' ''बाई, एखादा विषय माझ्या डोक्यात आला की तो कागदावर उतरवल्याशिवाय मला चैन पडत नाही. पण आता मी काय करु ?'' काकुळतीला येऊन तो बोलत होता. त्याची घुसमट घेऊन त्याच्या बाबांशी बोलण्याचे मी त्याला वचन दिले. त्याप्रमाणे त्याच्या वडिलांना बोलावलेही पण दोन दिवसांनी त्याची आई आली. तिच्या बोलण्यातून बाबांची करडी शिस्त लक्षात आली. पण त्या मुलाच्या भवितव्याचा विचार करुन त्याच्या बाबांशी बोलण्याचा मी आग्रहच धरला. हो नाही करता करता ते आले. त्यांना मी फक्त एवढेच म्हटले, 'मी कोणी तज्ज्ञ नव्हे. पण कलाशिक्षिका या नात्याने मला वाटते, तुम्ही त्याचे मन जाणून घ्यावे. त्याला चित्रे काढू द्या. एवढीच विनंती करते. कारण त्याच्या मनातला विचार तो जोपर्यंत कागदावर उतरवत नाही तोपर्यंत तो अस्वस्थ असतो. अशा परिस्थितीत त्याचे अभ्यासात लक्ष लागेल कसे ? पर्यायाने त्याचे नुकसान होईल. पण बराच वेळ जर तो चित्रात घालवू लागला तर त्याला समजावण्याची जबाबदारी माझी.'

हो, नाही करता करता तो एकदाचे कबूल झाले. दुसऱ्या दिवशी तो मुलगा वर्गात आला तोच प्रसन्न चेहऱ्याने. ही संधी साधून मी त्याला चित्रकलेबरोबरच अभ्यासही छान कर, असे सांगितले. त्याने ते मान्य केले. १० वीच्या परीक्षेत ८५ टक्के गुण मिळवून तो उत्तीर्ण झाला नंतर बऱ्याच महिन्यांनी त्याचे बाबा वाटेत भेटले तेव्हा कौतुकाने म्हणाले, 'आमचा नीलेश आंतरमहाविद्यालयीन पेंटिंग स्पर्धेत कॉलेजचे प्रतिनिधित्व करतो आहे. हे ऐकून असे मनात आले हेच कौतुक आधी केले असते तर?

बऱ्याचदा पालक चित्रकला, रांगोळी या आणि अशा निर्मितिक्षम विषयांकडे निव्वळ मनोरंजन म्हणून पाहतात. याच कला मुलाला मन एकाग्र करायला शिकवतात. अभ्यासाची बैठकही याच माध्यमातून होते. त्यांची सौंदर्याभिरुची वाढीस लागते.

मुलांची चित्रे नुसती पाहायची नसतात तर वाचायचीही असतात. त्यासाठी त्यांच्याशी संवाद साधायला हवा. (पण वेळ कुठे आहे?) मुलांच्या चित्रांना विषयाचे बंधन नाही. ती आपल्या सभोवतालच्या आकारातून आकार शोधतात. त्याच्याशी ज्याचे साधर्म्य आहे ते त्यांचे चित्र असे म्हणतात. उदा. एखादे वर्तुळ कधी चांदोबा, कधी पुरी तर कधी भाकरी किंवा बांगडीही होते. एकदा माझ्या मुलीने भिंतीवर असे चित्र काढून 'आई

पृष्ठ क्र. १७ वर

# देहेत्यागिता

*मनाच्या श्लोकांतील समर्थांचा एकेक शब्द, एकेक विचार माननीय आहे. अशाच एका विचाराबद्दल - संपादक*

श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज हे जसे ज्ञानेश्वरीपेक्षां त्यांच्या हरिपाठामुळे बहुजन समाजाला ज्ञात आहेत त्याचप्रमाणे दासबोधापेक्षा मनाच्या श्लोकांमुळे श्री समर्थ रामदास हे सर्व लहानथोरांना परिचित आहेत. मनाच्या श्लोकांमधून त्यांची लोककल्याणाची तीव्र तळमळ दिसते त्यामुळे या लोककल्याणाच्या तीव्रतेमुळे त्यांची मनाच्या श्लोकांमधील भाषा नैसर्गिकपणे ओघवती, अत्यंत प्रासादिक, प्रगल्भ, अत्यंत तेजस्वी व अर्थपूर्ण आहे. प्रत्येक श्लोकांत त्यांनी एक किंवा अधिक सुंदर विचारांची गुंफण केली आहे. भाषा सुलभ असल्यामुळे हे श्लोक म्हणणाऱ्याच्या व ऐकणाऱ्याच्या मनावर झटकन परिणाम करतात. त्यामुळेच खूप लोक 'मनाचे श्लोक' नियमाने वाचतात. या श्लोकांची लोकप्रियता एवढी आहे कीं शाळाशाळांतून किंवा घरोघरी लहान मुलांकडून या श्लोकांचे पाठांतर करून घेतात व मुलांना उत्तेजन मिळावे यासाठी स्पर्धाही घेतल्या जातात. सुमारे तीनशे वर्षांपूर्वी लिहिलेले हे वाङमय अजूनही बोधप्रद व ताजेतवाने आहे.

या बोधप्रद अशा २०५ मनाच्या श्लोकांमधून 'देहे त्यागितां कीर्ति मागे उरावी' या श्लोकाचे माझ्या अल्पबुद्धीप्रमाणे विवेचन करण्याचा प्रयत्न करीत आहे.

देहे त्यागितां कीर्ति मागे उरावी
मना सज्जना हेचि क्रीया धरावी।
मना चंदनाचे परी त्वां झिजावे
परी अंतरी सज्जना नीववावे॥

कोणताही सजीव प्राणी, मनुष्य असो किंवा किडामुंगी असो तो जन्ममृत्युच्या फेऱ्यातून कधींच सुटत नाही. ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू अटळ आहे. नुसते जन्म व मृत्यू असे कीडामुंगीसारखे जीवन न जगतां मरणोत्तर आपली कीर्ति मागे राहील असे दैदीप्यमान जीवन जगावे म्हणूनच श्रीसमर्थ रामदास स्वामींनी दासबोधात म्हटले आहे कीं

मरणाचे स्मरण असावे। हरिभक्तीस सादर व्हावे।
मरावे कीर्तीस उरवावे। येणे प्रकारे॥

मानवाने आपल्याला कधीतरी मरण येणार आहे याचे सतत स्मरण असू द्यावे व तरीसुद्धा जन्मभर संसार नेटका हरिभक्तीतही रममाण व्हावे परोपकारी वृत्ती ठेवावी त्यामुळे मृत्यूनंतर सुद्धां लोक आपल्याला नावे ठेवणार नाहीत तर-आपली कीर्तीच लक्षांत ठेवतील.

श्रीसमर्थ रामदासांनी 'देहे त्यागितां' या मनाच्या श्लोकांत 'सज्जन' हा शब्द संत किंवा सत्पुरुष या अर्थाने वापरला आहे. मनुष्याने जन्मभर जास्तीत जास्त सत्कृत्ये करावीत. स्वत: काया वाचा मनाने चंदनवृक्षाप्रमाणे झिजावे व सज्जन लोकांच्या अंत:करणाला समाधान व आनंद होईल असे वागावे. मनुष्याने केवळ कीर्तीसाठी सत्कर्म आचरणांत आणू नये तर सत्कर्मासाठीच सत्कर्म करावे. कीर्ती त्याचे अनुषंगिक फल होय. जसा चंदनवृक्ष हा फलकुसुमवर्जित असून शरिराचा दाह नाहीसा करणारा, शांतलता देणारा, परोपकारी व सेव्य: स्वादिह सर्वलोकमनसानंदनश्चंदन:। असा सर्व लोकांना प्रिय आहे तसेच मनुष्याने सुद्धा चंदनवृक्षासारखे झिजून परोपकारी वृत्ती ठेवून वागावे म्हणजे मृत्यूनंतर सुद्धा आपली कीर्ती लोक जन्मभर गातील. 'मरावे परी कीर्तीरूपे उरावे' या समर्थांच्या

उक्तीप्रमाणे आपल्या देशांत अनेक थोर महात्मे होऊन गेले. अगदी, तीनशे वर्षांपूर्वीचे श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या काळातले उदाहरण द्यावचे झाले तर त्यांचे परमशिष्य श्री शिव छत्रपती महाराजांचे उदाहरण देता येईल. शिवाजी महाराजांच्या आपल्या हिंदुस्थानातील गरीब प्रजेवर परकियांकडून अनन्वित अत्याचार होत होते या गुलामगिरीच्या जोखडांतून व स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांतून आपल्या देशाचे, धर्माचे संरक्षण करण्याकरिता शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली अनेक शूरवीरांनी बलिदान केले. नरवीर तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे अशा कित्येक ज्ञात व अज्ञात वीरांनी आपले देह अर्पण केले व ते कीर्तीरुपाने अजरामर झाले. या शतकातील लो. बाळ गंगाधर टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वामी विवेकानंद, नेताजी सुभाष, म. गांधी, महर्षि कर्वे, म. ज्योतिबा फुले अशा देशासाठी व समाजासाठी देह झिजविणाऱ्या महात्म्यांची नांवे कीर्तीरुपाने अजरामर झालेली आहेत या सर्व थोर नेत्यांना माझे शतशः प्रणाम.

'दिव्यत्वाची जेथ प्रचिती।
तेथे कर माझे जुळती॥

जय जय रघुवीर समर्थ

**सौ. मालती देवधर**
कलाविहार, प्रशांतनगर,
नौपाडा, ठाणे
दू. क्र. २५४० ३४६०

पृष्ठ क्र. १५ वरुन

## या चित्रांमागे दडलंय् काय ?

हे बघ झुदल (झुरळ), असे सांगितले. वर म्हणते कशी आता याची पाल करते असे म्हणत झुरळाच्या मिशा आणि दोन्ही बाजूचे मधले पाय पुसून फक्त शेपटी लावली आणि म्हणाली, 'ही बघ पाल'.

भौमितिक आकारातून मुले असे आकार शोधतात. निर्मितीकडे लक्ष गेल्याने त्यांच्या विघातक कृतींना आळा बसून त्यांच्याकडून विधायक कृती घडते. असे निर्मितीक्षम हात असूनही सरकार, शिक्षणतज्ज्ञ, संस्थाचालक, मुख्याध्यापक यांना मात्र कलेचे वावडे. त्यांच्या लेखी या विषयाला महत्त्व नाही. कलाशिक्षक हा फक्त शाळा सजवण्याकरिता नाही तर तो माणूस घडवतो हे यांच्या कधी लक्षात येणार?

इ. ९ वी /१० वीतील मुले पौगंडावस्थेत असतात. याच काळात त्यांची कलात्मक वृत्ती बहरते, सौंदर्याभिरुचीचा विकास होतो. या काळात जर त्यांच्या हातांना काही काम नाही मिळाले तर कोंडमारा झालेली ही मुले मग आपली कलेची भूक शाळेच्या भिंतीवर, टॉयलेटच्या भिंतीवर चित्र काढून भागवतात. तेव्हा एकच विनंती-मुलांना चित्रे काढू द्या, मोकळे होऊ द्या. त्यांची मने मारू नका अन्यथा पुढच्या पिढीचे नुकसान होईल.

**सौ. मंजिरी दांडेकर**
मधु-मिलिंद बिल्डिंग, घंटाळी रोड
नौपाडा, ठाणे (प) ४००६०१.
दूरध्वनी क्रमांक : २५४१ ४५३९

# भारतीय उत्सव

*भारतीय सण व उत्सव यातील वैविध्याकडे लक्ष वेधणारा हा लेख आहे. - संपादक*

स्वत:ला व्यक्त करणे, आपल्याला जाणवलेले सुख, जाणवलेले दु:ख दुसऱ्याला सांगणे हा माणसाचा स्थायी भाव आहे. या संवादातूनच पुढच्या क्षणांची प्रेरणा माणसाला मिळत असते, त्याच्या जगण्याला प्रयोजन मिळत असते. आयुष्यात दु:ख आहे हे तर खरेच, पण सुख आहे, आनंद आहे हे ही तितकेच खरे! हा आनंद, ही सुख संवेदना दुसऱ्यांपर्यंत पोहचविणे, प्रकट करणे यासाठी मानवी संस्कृतीमध्ये उत्सव या संकल्पनेचा विकास झालेला दिसतो. उत्सव या माध्यमातून माणूस हा संवाद अधिक अर्थपूर्ण करतो.

भारतीय संस्कृतीच्या, किंबहुना एकूणच मानवी संस्कृतीच्या मूळापर्यंत आपण मागे गेलो, तर असे लक्षात येते की प्रत्येक दिवसाचा, तिथीचा, तारखेचा एक ना एक उत्सव या भूमीवर कोठे ना कोठे साजरा होत असतो. भ्रष्टाचार, दंगे धोपे, अनागोंदी कारभारांचे अगणित किस्से, अस्मानी सुल्तानी संकटे अशा स्वरुपाच्या बातम्यांनी वर्तमानपत्रे, दूरदर्शनच्या वाहिन्या ओसंडून वाहताना दिसतात. हे असं वाचलं पाहिलं की मानवी जीवन, विलक्षण निराशाजनक वाटायला लागते. पण या नैराश्याची राख झटकून काळ्या रंगाच्या पलीकडे पाहिलं तर लक्षात येतं, पूर्व क्षितिजावर सूर्यनारायणाच्या अस्तित्त्वाने सुरु होणारा दिवस हा उत्सवच असतो. प्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर यांच्या 'कसं जगायचं' या कवितेत त्यांनी म्हटल्याप्रमाणे आपण कसे पाहतो यावर सर्व अवलंबून असतं.

## स्पर्शांचे उत्सव

रेकी या स्पर्श उपचार पद्धतीतील स्पर्श ही भावनाच उदाहरणादाखल पहा. आईच्या गर्भातील अस्तित्वाच्या पहिल्या स्पर्शापासून सुरू होणारी जीवनयात्रा हा विविध स्पर्शांचा अखंड उत्सव असतो. या अखंड उत्सवमालिकेतूनच मग अध्यात्मिक विकासाचे मार्ग सापडायला सुरुवात होते. ज्ञानेश्वरीतील पाचव्या अध्यायात ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''स्पर्शासी तरी जाणे' परिमलु सेवि हराणे। अवसरोचित बोलणे तयाही आथि।'' या ओवीमधील स्पर्श हा शब्द महत्त्वाचा आहे. योगाने युक्त असणाऱ्या साधकाबद्दल माऊली म्हणतात, ''योगयुक्त पुरुष स्पर्श जाणतो, नाकाने वास घेतो आणि समयोचित भाषणही करतो' असे हे वर्णन आहे. हे सर्व करुनही तो योगयुक्त असतो हे महत्त्वाचे. या ओवीचा दाखला देण्याचे कारण म्हणजे त्वचेला होणारा पाण्याचा स्पर्श, झाडा फुलांचा स्पर्श हा प्रत्येक क्षणी उत्सव ठरू शकतो. सांत्वनासाठी वा शाबासकीसाठी पाठीवरुन फिरणाऱ्या हाताच्या स्पर्शात पुढे येणाऱ्या असीम क्षणांचे अतिशय नि:शब्द असे आश्वासन असते, मार्गक्रमण करण्यासाठी ममत्वाने व्यक्त केलेले प्रोत्साहन असते आणि यातच स्पर्शांची अभिव्यक्ती उत्सवात परिवर्तित होण्याची शक्यताही असते. हे कळण्यासाठी मन मात्र हवं.

एखाद्या छापील कागदाच्या पाच पन्नास झेरॉक्स प्रती काढाव्यात तितक्या कोरड्या मनाने दिवस रात्रींच्या झेरॉक्स प्रती काढल्याप्रमाणे जीवन जगणाऱ्या मनाला मात्र या उत्सवाच्या प्रेरणा कळणे कठीण असते. रोजचा दिवस,

घड्याळात उगवणारा प्रत्येक क्षण आनंदाचा वसा घेऊन उत्सवासारखा साजरा करीत जगण्याची वृत्ती हवी, तसा संस्कार हवा.

उत्सवाच्या क्षणाक्षणांनी
भारुनि जावे
क्षणाक्षणांचे गाणे
उत्सव व्हावे

तरच त्यामागील अध्यात्म, तत्त्वज्ञान समजण्याची पात्रता आमच्यात निर्माण होईल.

## समाजाचे अस्तित्त्व

मानवी समाजात उत्सव साजरे करण्याच्या निरनिराळ्या प्रथा, चालीरीती कधीपासून चालू झालेल्या असाव्यात याचे ठाम पुरावे मिळणे अशक्यच आहे. पण आपल्या शरीरापासून आपल्यासारखा एक जीव, एक शरीर निर्माण होणं, ही निर्मिती, क्रूर श्वापदांची शिकार करुन आपण आपलं पोट भरू शकतो याची जाणीव, टोळीयुद्धात आपणही जिंकू शकतो ही आदीम अवस्थेतील पराकोटीची आत्मविश्वासाची भावना हे सर्व उत्सवांच्या सुरुवातीची पहाट मानावी लागेल. म्हणजेच आदिमानवाच्या अस्तित्त्वा इतके उत्सवांचं अस्तित्व आदीम आहे.

या उत्सवी क्षणांतून समाज निर्माण झाले, माणसं समाज म्हणून एकत्रित टिकू लागली, नांदू लागली. या सहअस्तित्त्वातूनच पिढ्या पिढ्यांच्या परंपरा तयार झाल्या आणि संस्कृतीला आकार येत गेला. भारतासारख्या महाकाय देशात आपण भारत म्हणून एकत्र असणं, देश म्हणून आपली ओळख असणं यात तर नानाविध उत्सवांचे कल्पनातीत योगदान आहे.

अतिशय समृद्ध परंपरा लाभलेले, रंगांच्या सर्व छटांचा मुबलक आविष्कार असणारे, आनंद ओसंडून वाहील अशा संगीत नृत्यादी कलांना अमर्याद वाव असणारे उत्सव हे तर खरे भारतीयत्व आहे! आसेतुहिमालय सर्व राज्यांत, प्रांतात, प्रदेशांत एकात्मता वाढविण्याचे मोठे काम या उत्सवांनी, उत्सवांच्या या परंपरांनी केला आहे. धर्म आणि जातिभेद असले तरी प्रत्येक धर्मामधील उत्सवांची, सणांची उत्सुकता कुतुहल इथल्या माणसाच्या मनात आहे. हिंदु मुस्लिम संबंधाबाबत आपण काहीही विचार करा, याबाबत वाद प्रवाद काहीही असोत, पण मोहरमच्या ताजियात हिंदु बांधव आनंदाने सहभागी होतात, तर दिवाळी, रंगपंचमी अशा उत्सवांचा मुस्लिमही आदर करतात. साने गुरुजींसारखा संवेदनशील लेखक अशोक आणि आमीन सारखं मित्रप्रेमाचं कथानक लिहू शकतो, आणि शांताराम बापूंच्या प्रभातनं काढलेला 'शेजारी' चित्रपट गाजतो. या सर्वांत समान सूत्र असतं ते आपण भारतीय आहोत या भावनेचं!

## सत्य, शिव आणि सौंदर्य

प्रत्येक लहान मोठ्या उत्सवाबाबत विचार करताना लक्षात येतं ते असं, की प्रत्येक उत्सवामागे धार्मिक, तत्त्वज्ञानपर, सामाजिक असं तत्त्वज्ञान आहे. उत्सव साजरा करण्याच्या तऱ्हा भलेही वेगळ्या असोत, सर्व उत्सवांत कळत नकळत संगीत, ताल, सूर यांचा समावेश आहे. त्यामुळे कलाविष्काराच्या प्रगतीत या उत्सवांचं मोठं योगदान आहे. याचबरोबर या उत्सवांचे शैक्षणिक मूल्यही मोठे आहे. या उत्सवांमुळेच भारतीय लोकशाहीचे जगात 'स्पिरिच्युल डेमॉक्रसी' असे यथार्थ वर्णन केले जाते. "In every line and every thought the eternal we see and supreme we pray" असं एक वाक्य वाचनात आलं. हे सुप्रीम म्हणजे सत्य, शिव आणि सौंदर्य आहे. भारतीय शिक्षणपद्धतीचा मूळ गाभा जर कोणता असेल तर तो हा आहे. या पातळीपर्यंत येण्याचा मार्ग विकसित होतो तोही उत्सवातूनच. सत् चा असत् वर विजय हे बहुतेक उत्सवांच्या कथांमधील प्रमुख सूत्र असते.

कोणता क्षण कोणासाठी अधिक उत्सवी असेल हे सांगता येणं कठीण आहे. धार्मिक, सामाजिक, अध्यात्मिक उत्सवांबरोबरच व्यक्तिगत जीवनातील काही क्षण उत्सवी भावावस्थेत आपण साजरे करतो. याचं उदाहरण द्यायचं तर 'साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी दसरा' या ओळीतील आशय पहा. हे साधुसंत माझ्यासाठी माझे वडील असतील, गुरू असतील वा सखा असेल. मी आणि माझा अनुभव त्या क्षणाला 'दिवाळी दसरा' ठरवतात. माझे विद्यार्थी व कलासक्त मित्र शहनाईवादक पं. शैलेश भागवतांकडे, नंतर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित झालेले पैगंबरवासी शहनाई नवाज बिस्मिल्ला खाँसाहेब आले होते. त्या प्रसंगाचा मी साक्षीदार आहे. खाँसाहेबांसारख्या एवढ्या मोठ्या कलाकाराशी बोलण्याची संधी देणारा क्षण हा माझ्या आयुष्यातला एक मोठा उत्सवच ठरला. कलाकारांना रूढ अर्थाने मान्य असलेला धर्म नसतो हे खाँसाहेबांच्या बोलण्यातले सूत्र होते. हा वैयक्तिक उत्सवाचा, आनंदाचा भाग झाला. दूरदर्शनवर जेव्हा एखाद्या जुन्या पिढीतला एखादा गायक, संगीतकार दिसतो, त्याच्या मुलाखतीचा कार्यक्रम पुन:प्रसारित होतो तेव्हाही साधुसंत घरात आल्यासारखे मला वाटते, अगदी श्रद्धेने मी त्यांच्या प्रतिमेला मनोभावे नमस्कार करतो. अशा कलाकारांचा कलाविष्काराच रुक्ष जगण्याचे रूपांतर उत्सवात करतो.

**भारतातील उत्सव**

भारतातील उत्सवांची तपशीलवार माहिती करून घ्यावयाचे ठरविल्यास आयुष्य पुरणार नाही, इतके वैविध्य आहे. एक दीपोत्सवासारखा उत्सव, पण साजरा करण्याच्या तऱ्हा किती? असंख्य जाती, जमाती, धर्म, परंपरा, राज्ये आणि प्रांत यांच्यातील काही प्रमुख उत्सवांचा फक्त उल्लेख या निमित्ताने येथे करतो. गेले काही दिवस या अनुषंगाने माहिती शोधण्यात गेले. अनेक ग्रंथ पाहिले, संदर्भ शोधले तेव्हा अवाक झाले. (तरी इंटरनेट या माध्यमाचा वापर केलाच नाही!) या उत्सवांचे वर्गीकरण विविध प्रकारांनी करता येणे शक्य आहे. वर्गीकरण परिपूर्ण करावयाचे असेल तर अनेक खंडात ग्रंथच लिहावा लागेल. लेखाची मर्यादा लक्षात घेऊन केवळ धर्म व प्रदेशाच्या आधारे माहीत करून घेतलेले काही उत्सव पुढे देत आहे.

**हिंदू धर्म -**

| | | |
|---|---|---|
| मकरसंक्रांत | रथसप्तमी | महाशिवरात्री |
| धूलीवंदन | नागपंचमी | रंगपंचमी |
| वर्षप्रतिपदा | रामनवमी | दत्तजयंती |
| हनुमानजयंती | रक्षाबंधन | जन्माष्टमी |
| गणेशचतुर्थी | नवरात्र (देवीचे) | दसरा |
| दीपावली | गणेशजयंती | दासनवमी |
| तुकारामबीज | वटसावित्री | देवदिवाळी |
| गीताजयंती | अक्षय्यतृतीया | बैलपोळा |

(यादी आठवेल अशी आहे, तीत सूत्र नाही)

**मुस्लिम धर्म**

इद् उल-कुर्बान (बकरी ईद) रमजान महिना

इद् उल् फित्र शबे बारात लैलत उल् कुद्र

मोहरम

**जैन धर्म**

दशलक्षणपर्व ज्ञानपंचमी महावीर जयंती

**पारशी धर्म**

पतेती खोर्दाद साल

**ज्यू धर्म**

रोशा इशान्ह पुरिम शवुहो

**ख्रिश्चन धर्म**

लेन्ट गुडफ्राय डे इस्टर

नाताळ सेंट फिलोमेनास् डे

**बुद्ध धर्म** बौद्धजयंती

**शीखधर्म**

वैसाखी गुरुपुरब नानकजयंती

ही यादी आणखी कितीतरी वाढवता येईल. या प्रमुख संप्रदायांबरोबरच त्यांच्या अनेक उपशाखांच्या उत्सवांचा ही विचार करता येईल. काही उत्सव प्रादेशिक असतात. मकर राशीचे संक्रमण हा दिवस महाराष्ट्रात तिळगुळ व हळदीकुंकवापुरता असतो तर गुजरात राजस्थान मध्ये आकाश पतंगांनी व्यापणारा असतो. प्रदेशांचे म्हणून केले जाणारे काही उत्सव पुढील प्रमाणे

| | |
|---|---|
| तामिळनाडु - | विराप्पु पोंगल तिरूचेंदुर स्कंदषष्ठी |
| केरळ - | ओणम् (फुलांचा उत्सव) |
| मध्यप्रदेश - | गोवर्धन नवान्त सुवाता गंगादशमी |
| आंध्रप्रदेश - | महालया रथसप्तमी वेसवाका पुनामी |
| ओरिसा - | खुडुसाकुती |
| बंगाल - | दुर्गापूजा मातृपूजा कालीपूजा |
| आसाम - | भोगा बिहु |

ही काही उदाहरणे झाली. गणेशोत्सव, दीपावली हे तर सर्व देशात जवळजवळ सर्व जाती धर्मात जणू काही संस्कृतीचे प्रतीक असणारे उत्सव ठरले आहेत. साजरा करण्याच्या पद्धती फक्त वेगळ्या. नृत्य आणि संगीत, रंग आणि रेषा हा या उत्सवांचा आत्मा आहे. फुले, पाने, निसर्गाचा हिरवा रंग ही यांची खासियत आहे. नवीन वर्षाचा पहिला दिवस ग्रेगारियन पंचांगांप्रमाणे असतो तसाच शालिवाहन पंचांगाप्रमाणे, पारशी धर्माप्रमाणे, विक्रम संवताप्रमाणे ... आणि अगदी व्यक्तिगत स्तरावर स्वत:च्या जन्मतिथीनुसारही असतो. निसर्गाच्या तर आम्ही इतके जवळ आहोत की पहिला पाऊस हाही आम्ही उत्सवासारखा अनुभवतो, कोकिळा दिसणे हाही उत्सवच असतो! पाणी हे तर जीवन आहे. आमच्या जीवनात जलोत्सवांचे स्थानही अतिशय लक्षणीय आहे. कुंभमेळा हे एकच उदाहरण आठवून पहा. शिवाय तीर्थरुप मानल्या जाणाऱ्या गंगा, सरस्वती, कावेरी इ. अनेक नद्यांचे उत्सव भारतीय संस्कृतीत आहेत. राम आणि कृष्ण हे भारतीय संस्कृतीने देवत्व बहाल केलेले पवित्र मंत्रच आहेत. त्यामुळे अनेक उत्सवांची मुळे आमच्या रामायण महाभारतासारख्या सामाजिक महाकाव्यातील काळापर्यंत मागे जातात. अंधारातून उजेडाकडे नेणारा ज्योतीचा प्रकाश हा जसा आमचे उत्सवांकित मन प्रकट करते, तसेच सूर्याचे उगवणे, मावळणेही आमच्यासाठी अर्घ्य द्यावे, सर्वार्पण करावे असे क्षण ठरतात. 'तीर्थ' ही संकल्पना केवळ याच मनोहारी संस्कृतीत पहायला मिळते. 'भारतीय संस्कृती' ही संकल्पना अतिशय विशाल तर आहेच, असे संप्रदाय, पंथ, जाती, धर्म या एका संकल्पनेत विलीन होतात. त्यामुळे उत्सवांच्या वर्गीकरणाचे कितीही तक्ते बनवले तरी 'हा भारतीयांचा उत्सव आहे' या भावनेमुळे ते तक्ते अर्थशून्य बनतात.

**मोहन पाठक**

## वि. प्र. मंडळ, ठाणे

### उपक्रम

१) भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला

२) दिशा व्यासपीठ

३) डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यान

४) विद्या प्रसारक मंडळ - वर्धापन दिन

५) नारळीपौर्णिमा - संस्कृत दिन

६) ५ सप्टेंबर - दीक्षांत समारंभ

# माझा शैक्षणिक प्रवास व ग्रंथालये

*ग्रंथ आणि ग्रंथालये ही मानवी जीवनातील दीपस्तंभ असतात. या विषयीचे अनुभव सांगणारा हा लेख - संपादक*

मुद्दे :

१) ग्रंथांचे, ग्रंथालयाचे महत्त्व
२) काही पुस्तकांची ओळख
३) माझा शैक्षणिक प्रवास व ग्रंथालये
४) माझी अपेक्षा

ग्रंथालये म्हणजे ज्ञानाचे सागर होत. ते मानवाचे उत्तम गुरू व सच्चे मित्र आहेत. कधीकधी त्यांच्या महत्तेला रेडिओ, टी.व्ही. यांसारख्या दृकश्राव्य साधनांमुळे ओहोटी लागल्यासारखे वाटते; पण ज्ञानार्जनासाठी ग्रंथालयांइतका प्रभावी पर्याय दुसरा नाही. भारतात या परदेशात ज्या अलौकिक व्यक्ती होऊन गेल्या, त्या सर्व ग्रंथप्रेमी होत्या. ग्रंथ हा त्यांचा प्राण होता. पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. होमी भाभा यांची तर स्वतःची ग्रंथालये होती. फावला वेळ ग्रंथालयात घालवण्यामुळे त्यांना त्यांच्या धकाधकीच्या जीवनात मोठाच विरंगुळा मिळत होता. अद्ययावत ग्रंथ त्यांच्या संग्रहालयात होते. ग्रंथांमार्फत ज्ञानकण वेचणाऱ्या या मधुमक्षिका होत्या.

'ग्रंथालये' ही 'अक्षरवाङ्मयाची भव्यकोषागरे' ही अखंडपणे वाहत असणारी ज्ञानसरिता, सहज उपलब्ध आहे. कितीही वेळा, कोणत्याही वेळी ग्रंथ आपली ज्ञानलालसा पूर्ण करतात; म्हणूनच ग्रंथालयांचे महत्त्व अधिक आहे. विद्या हे मृत्यू लोकीचं अमृत. मानवजीवन जरी क्षणभंगुर असले तरी त्यातले काही क्षण चिरंजीव करण्याचं कार्य आपल्याला ज्ञानामृत पाजून ग्रंथ करत असतात. तसं पाहिलं तर, आपण अक्षर ओळख झाल्यापासूनच वाचू लागतो. माझचं पाहा ना, चांदोबा, राजकन्यांच्या गोष्टी वाचण्याची लागलेली आवड वाढतच गेली. आपल्यापैकी प्रत्येक जण वयाच्या आठव्या - नवव्या वर्षापर्यंत ह्या राजकन्या, पऱ्यांच्या विश्वात वावरत असतो. मग हळूहळू समज येऊ लागते. चि. वि. जोशी, सानेगुरुजी वाचनात येतात, पुढे-पुढे कादंबऱ्यांची आवड लागते. पुस्तके गुरू व मित्र बनतात. तशी मीही आजवर बरीच पुस्तकं वाचली आहेत. शाळेत असलेल्या वाचनालयापासून ते सार्वजनिक ग्रंथालयांतील जितकी पुस्तकं वाचता येतील तितकी पुस्तके वाचण्याचा प्रयत्न केला आहे. दादरचे 'दादर सार्वजनिक वाचनालय' किंवा 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' सारख्या सार्वजनिक वाचनालयांनी विचारांत बदल घडवीत प्रगल्भता आणली ती आजपावेतो.

मुळात ग्रंथालये म्हणजे ग्रंथाचे आलय - ग्रंथाचे घर! किती, जवळीक साधणारी कल्पना! शाळेच्या वाचनालयातील केशवसुतांच्या कविता असोत किंवा 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' म्हणणाऱ्या कुसुमाग्रजांच्या कविता असोत, साहित्याची ओळख करून देणारी, मला भावणारी मराठी भाषेची जवळीक साधणारी ही सुरुवात होती. वाचनाचा छंद कोणाला लहानपणीच लागला तर त्याचे व्यसन केव्हा बनेल हे सांगता येणार नाही. माझ्या बाबतीत नेमके हेच घडले असावे. ना. सं. इनामदार, रणजित देसाई यांची पुस्तके कधी वाचू लागले हे माझं मलाच कळलं नाही.

**ना. सी. फडके यांचा कल्पनाविलास, अत्र्यांनी उधळलेली 'झेंडूची फुले' माटच्यांनी उलगडून दाखवलेले 'उपेक्षितांचे अंतरंग', पु. ल. नी नेलेल्या मलायाच्या समुद्रकिनाऱ्यावरील नारळाच्या झाडीतील प्रवासवर्णन,** सगळचं अद्‌भुत.

**शिवाजी महाराजांबद्दल** आपल्या मनात असलेला नितांत आदर व गाढश्रद्धा म्हणजे **'श्रीमान योगी'**. असंख्य दर्जेदार लेखक व त्यांच्या रसाळ ओघवत्या शैलीची ओळख करून दिली ती या ग्रंथालयांनी! माझा शैक्षणिक प्रवास सुरू झाला तो वेगवेगळ्या पुस्तकांनी. महाभारत, रामायणातल्या गोष्टी वाचताना शाळेच्या क्रमिक पुस्तकांबरोबरच वाचू लागले ते रोजची वर्तमानपत्रे. आज **'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'** किंवा **'Central Library'** फोर्ट असो जुन्या वर्तमानपत्रांची मांडणी इतकी सुरेख व सुव्यवस्थित केलेली आहे, जेणेकरून जुने सारांश मिळणे सोपे जात आहे. त्यावेळची मते, त्यावेळचे लेख यांचा परिचय होऊ लागला आहे. त्याविषयी सध्याची आठवण सांगताना, ग्रंथालय कामगार चळवळी, वेतनभत्ता वगैरे विषयी केलेला उहापोह, १९७१ पासूनच्या चळवळीचे असलेले प्रबंध अभ्यासू आहेत. महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात रेलचेल असणाऱ्या असंख्य पुस्तकांना पाहून, डोळ्यांचे पारणे फिटले, असे म्हणणे वावगे न ठरावे. महाविद्यालयाच्या शिक्षण कालक्रमात मराठी साहित्याची खरी ओळख झाली. त्यावेळी भावलेले गंगाधर गाडगीळांसारखे लेखक दुर्दम्य बनून आजही मनात घर करून आहेत. मॅक्झिम गॉर्कीची 'आई' ही कादंबरी कम्युनिस्ट लोकांचा आदर वाढावा अशीच. हिटलरचा नाझीवाद, किंवा विस्टन चर्चिलांचे चरित्र हे परकीय माणसांचे, भारताच्या स्वातंत्र्याचे कट्टर विरोधकांचे असूनही त्यांची भावलेली प्रतिमा, डोळ्यासमोर उभी राहते.

मराठी, इतिहास, भूगोल, इतर भाषा कोणतेही ज्ञान असो, ते पुस्तकरूपात मिळणारच. आज मी मोडी लिपी शिकत आहे. मराठीच भाषा-फक्त लिपी वेगळी. पण त्या लिपीचं ज्ञान मला पुस्तकांतूनच मिळत आहे. आयुष्याचं मर्म समजवणारी, आपल्या दुःखाला गोंजारत, उघड्या जगात विहार करताना मदत करणारी, ही पुस्तकं, त्याचं घर (ग्रंथालय) जीवनाचं अविभाज्य घटक बनून गेले. **उदयाचा संसार, घराबाहेर** सारखी अत्र्यांची नाटके, संन्यस्तखड्ग, उःशाप सारखी सावरकरांची नाटके, इतर कोठे नाही, पण मुंबई ग्रंथसंग्रहालयात सापडणारच.

माझा शैक्षणिक प्रवास व ग्रंथालये यांची सांगड घालताना लहानपणापासून ते शालेय दिवस व आता पूर्ण केलेली पदवी सारं आठवून गेलं. शाळेच्या दिवसातील ते छोटसं वाचनालय, रुपारेलमधील वाचनालय, विविध विषयांवर अभ्यास करताना माहितीपूर्ण लेख लिहिण्याकरिता सार्वजनिक वा महाविद्यालयांच्या वाचनालयांची झालेली मदत-त्यातून निर्माण झालेला 'मुंबई-झोपडपट्टी' सारखा एखादा प्रोजेक्ट किंवा अर्थशास्त्र, समाजशास्त्राच्या वेळी उपयोगी पडलेले संदर्भ ग्रंथ. आज, पदवी नंतर जगात प्रामाणिकपणे राहण्याकरिता, स्वबळावर उभे राहण्याकरिता ह्या पुस्तकांची विशेष गरज पडते. 'ब्रिटीश कौन्सिल', 'ससून' सारखा वाचनालयातून बाहेरील विश्वाची, त्यांच्या राहणीमानाची, त्यांच्या आधुनिकतेची सवय होऊ लागली आहे.

गत आयुष्याच्या आठवणी जपताना खूप पुस्तकांची आठवण होते आणि ह्या पुस्तकांना अत्यंत कमी पैशात/फुकट वाचावयाची संधी मिळाल्याने आम्ही सर्वच विद्यार्थी/वाचक ग्रंथालयांशी, ग्रंथालय कर्मचाऱ्यांशी कृतज्ञ आहोत.

ग्रंथरुपी गुरूत काही लोकोत्तर गुण आहेत. ते कोणत्याही शिष्यापासून 'गुरुकिल्ली' लपवून ठेवत नाही. गुरुदक्षिणेची हाव न धरता, वाट चुकलेल्या आपल्या जीवनात वाटाड्याचे काम करतात; तेही कोणत्याही क्षणी. गुरू आपल्या हाताशी असला तर ग्रंथ आपल्या हातात असतात. ग्रंथ हे खरोखरच आदर्शांचे दीपस्तंभ असतात; त्यांच्या प्रकाशात जीवनाची यशस्वी वाटचाल करता येते. ग्रंथ आपल्यावर स्वर्गीय आनंदाची जणू बरसात करतात.

पृष्ठ क्र. २८ वर

# गीताई - विनोबा

*गीतेच्या संदर्भातील 'गीताई' या पुस्तकाचा परिचय येथे देत आहोत. - संपादक*

परंधाम प्रकाशन,
पवनार, पृष्टे १०८
किंमत - ५० पैसे (वर्धा) महाराष्ट्र

जानेवारी ७४ ची 'गीताई' ची आवृत्ती माझ्याजवळ आहे. ती ५७ वी आवृत्ती आहे. त्याच्या प्रती २५००० होत्या.

गीताप्रवचने १९३२ साली धुळ्याच्या जेलमधे विनोबाजींनी दिली. साने गुरुजींनी ती त्यावेळी लिहून घेतली. त्यानंतर त्याचे पुस्तक निघाले असणार. 'गीताई' 'गीताप्रवचने' नंतर की आधी लिहिली गेली याचा कुठे खुलासा नाही. पण आगेमागे लिहिली गेली असणार साधारण त्याच सुमाराला.

'गीताई' हे गीता ग्रंथाहूनही लहानसे पुस्तक म्हणण्यापेक्षा पुस्तिका आहे. यात गीतेचे संस्कृत श्लोक नाहीत. अर्थही नाही. कारण 'गीताई' हाच गीतेच्या संस्कृत श्लोकांचा मराठी समश्लोकी अनुवाद आहे. गीतेचा भावार्थ समजेल अशा रीतीने अतिशय सोप्या व सुलभ मराठीत हा अनुवाद केलेला आहे.

विनोबा म्हणजे 'गीताई' असे निदान मराठी भाषिकांसाठी समीकरण आहे! गीतेचा समश्लोकी समच्छंदी मराठी पद्यानुवाद म्हणजे 'गीताई'!

गीताईच्या खोल अध्ययनासाठी मार्गदर्शक साम्ययोग दीपिका म्हणजे हे ग्रंथ-त्रय-

१) गीता प्रवचने

२) स्थितप्रज्ञ दर्शन - गीतेची आदर्शमूर्ती! प्रार्थनेत नित्य म्हटल्या जाणाऱ्या अठरा श्लोकांवर मूलगामी विवेचन! ग्रंथकर्त्यांच्या जीवन दर्शनाचा गाभा या ग्रंथात आढळेल.

३) गीताई चिंतनिका - गीताई, गीताध्यायसंगती आणि १०८ साम्यसूत्रे यात आहेत. अभ्यासकांचे गीताईचें चिंतन चिंतनिके शिवाय पूर्ण होऊ शकणार नाही. (हे सर्व ग्रंथ वरील पत्यावर उपलब्ध होऊ शकतील.)

गीताई माऊली माझी तिचा मी बाळ नेणता
पडता रडता घेई उचलूनि कडेवरी ॥ विनोबा

मुखपृष्ठाच्या मागे व मलपृष्ठाच्या मागे 'गीताई ची अधिकरणमाला दिली आहे. यात सात कडवी आहेत. संपूर्ण गीतासार त्यात आलेले आहे.

सुरवातीला 'गीताईचें ध्यान' आहे ते असे
भक्ताते प्रतिबोधिलीस समरी
नारायणे श्रीवरें
मुक्ते। संग्रथिलीस मान्य मुनिने
वेदान्त - विद्याकरें।
माते! षष्ट्यधिकारिणी सतशती
अष्टादशाध्यायिनी
तूतें मी अनुसंधितो निशिदिनी
गीते! भयद्वेषिनी॥

अनुक्रमणिकेत विनोबाजींनी गीतेच्या अध्यायांना स्वत: दिलेली नावे दिलेली आहेत. गीता प्रवचनेमध्येही हीच नावे अनुक्रमणिकेत आहेत. फक्त जरा सविस्तर आहेत इतकेच.

- अध्याय १ ला गीतेच्या पहिल्या श्लोकाचा हा अनुवाद पहा - धृतराष्ट्र म्हणाला -

पृष्ठ क्र. ३०

# परिसरातील वृक्ष - बहावा

*महाविद्यालय परिसरात अनेक महत्त्वाचे वृक्ष आहेत. निसर्गसंपन्न अशा या परिसरातील 'बहावा' या वृक्षाची ही माहिती. - संपादक*

भारतीय वृक्षांमध्ये एक अतिशय सौंदर्यपूर्ण म्हणून गणले जाणारे झाड म्हणजे बहावा हे होय! उन्हाळ्याच्या कोरड्या व उष्ण दिवसात आपल्या लक्ष्यवेधी रंगांनी हे झाड टेकड्या व माळरानांना वेगळे सौंदर्य आणते. असह्य अशा उन्हाळ्यात शहरातही आपल्या रंग उधळणीमुळे आपल्या जीवनात एक प्रकारचे प्रखर तेज आणणारे हे झाड आहे. भारताच्या बहुतेक भागात, विशेषत: डोंगरांवरील पानझडीच्या जंगलात हे झाड हमखास आढळते.

वनस्पतिशास्त्रीय नाव - कॅशिया, पिस्तुला

कुल - कॅसियाल्पिनीएसी

इंग्रजी नावे - इंडिया लॅबर्नम, गोल्डन शॉवर, पुडिंग पाइप ट्री.

भारतीय भाषांतील नावे

| | | |
|---|---|---|
| मराठी | - | बहावा |
| हिंदी | - | आमलतास |
| बंगाली | - | अमुलतास, सोनडाल, बंदारलाटी |
| कन्नड | - | काक्री |
| मल्याळम् | - | बहावा, भावा |
| ओडिसी | - | सनदारी |
| पंजाबी | - | अलाश |
| तामिळ | - | अण्पाई, कोकाई, लिस कोंटाई |
| तेलुगु | - | रेलु, अरगवधामु |

इंग्रजीतील इंडियन लॅबर्नम हे नाव युरोपिअन लॅबर्नम वृक्ष व या भारतीय वृक्षातील फुलांच्या रंगांमुळे दिले गेले. झाडाला लागणारे व वाऱ्यावर डहरणारे सोनेरी पिवळ्या रंगांच्या फुलांचे झुबके पाहता गोल्डन शॉवर हे नाव अतिशय सार्थ ठरते. या झुबक्यांतून होणारा सोनेरी पिवळ्या फुलांचा वर्षाव हे नाव सार्थ ठरवतो. मुंबईत तर 'लॅबर्नम रोड' हे एका रस्त्याचे नाव आहे.

वनस्पतिशास्त्रीय जाणीवसूचक कॅशिया हे ग्रीक नाव असून सुवासिक खोड असलेल्या दालचिनीशी निगडीत जात सूचित करणारे आहे. याच्या फळाच्या बासरीसारख्या नळीच्या आकारावरून बिस्तुला हे नाव आहे.

## वृक्ष वर्णन

बहावा हा ६ ते १५ मीटर उंचीपर्यंत वाढणारा लहान, मध्यम आकाराचा वृक्ष आहे. याची साल झाड लहान असताना हिरवट राखी रंगाची व मऊसर असते, पण पुढे झाड वाढल्यावर चॉकलेटी व कडक होते. याच्या सालीत औषधी गुणधर्म असल्याने झाडाला बऱ्याचदा इजा होते. साल काढल्याने खोड बऱ्याचदा फोड आल्यासारखे, उदास दिसते. सुदैवाने विद्याप्रसारक मंडळाच्या ज्ञानद्वीपावरील बहावाची झाडे मात्र योग्य निगा राखली गेल्याने व अशा इजेपासून दूर असल्याने चांगली आहेत. बहावाची पाने गर्द हिरव्या रंगाची व संयुक्त रचनेची असतात. झाडाची पाने लहान असताना तांबट रंगाची, मऊ, झुबक्यात मिटलेली असतात. प्रत्येक पानाला (डहाळीला) पानांच्या ६ ते ८ जोड्या असतात. पाने ३ ते ८ सेमी रुंद व ५ ते १२ सेमी लांब असतात. मार्च ते मे हा काळ वृक्षाच्या पानगळीचा असतो.

या पानगळीच्या दिवसाच्या वृक्षाला लोंबकळणारी सुंदर व पुष्कळ फुले येतात. वानसशास्त्रीय परिभाषेत ज्याला

'रेसमो' म्हटले जाते तसा हा पुष्पसंभार असतो. खाली लोंबकळणाऱ्या गुच्छाच्या तळाची फुले आधी उमलतात. गुच्छातील काही फुले पूर्ण उमललेली, काही अर्धोन्मिलित तर काही कळीच्या अवस्थेत असतात. काही कळी पूर्व अवस्थेत उमलून रंगांची उधळण करण्याच्या प्रतीक्षेत असतात. ३ ते ५ सेंमी ची ही फुले पिवळी धमक असतात. फुलातील पुंकेसर अभ्यास करावेत असे असतात. प्रत्येक फुलात १० पुंकेसर असतात. पैकी ३ लांबीने जास्त, ४ लांबीने कमी तर ३ अगदीच छोटे असतात. ऐन बहरात असणारे पिवळ्या धमक फुलांच्या झुबक्यांनी लगडलेले बहाव्याचे झाड हे उन्हाळ्यातील अतिशय विलोभनीय दृश्य असते. सुरुवातीचे फुलांचे गुच्छ उमलताना गळायला आलेल्या पिवळ्या पानांसारखे दिसतात. हा बहराचा काळ नवीन पाने उगवेपर्यंत चालू असतो.

बहावाची वाढ ही तुलनेने सावकाश होते. पूर्ण वाढ व्हायला दहा वर्षे लागतात. फुलांचा पहिला बहर पाच वर्षांनी येते. त्यानंतर प्रत्येक उन्हाळ्यातील बहर हा दृष्टीला सुखद ठरतो. बहावाची फळे ही अशीच नजर खिळवून ठेवणारी असतात. वानसशास्त्रीय भाषेत ज्यात 'पॉड' म्हटले जाते, तशी म्हणजे शेंगाच्या आकाराची फळे असतात. ४०-६० सेंमी लांब आणि २-२० सेंमी जाड असे हे फळ असते. फळाचा रंग चॉकलेटी असतो व जसे ते पिकत जाते, तसा काळसर होतो. आतील कप्पे दर्शविणाऱ्या नाजुक व गुंतागुंतीच्या रेषा निसर्गाची पूर्णत्वाने काम करण्याची पद्धतच जणू दर्शवितात. झाडाच्या फांद्याना लाठीसारख्या दिसणाऱ्या अशा या शेंगा शेकड्यांनी लोंबकळत असतात. बंगाली भाषेतील बंदाल लाटी हे नाव या फळांच्या बाह्य दर्शनावरूनच आले आहे. फळांतील या समांतर अशा कप्प्यांच्या भिंतींना लगटून गडद चॉकलेटी किंवा काळसर, गोड गर आणि चपट्या बिया असतात, हे विशेष।

बहावाच्या या टणक झाडाला गुरे तोंड लावत नाहीत, त्यामुळे गुरचराई नसलेल्या क्षेत्रात ही झाडे लावता येतात. कमी पाण्यावर जगण्याची या झाडाची क्षमता कोरडवाहू क्षेत्रात त्याची लागवड करण्यास योग्य आहे.

## लागवड व संवर्धन

या झाडाची लागवड बियांतून होते; पण याची गती अगदी सावकाश असते. कित्येकदा काही वर्षेही जातात. त्यामुळे अनेक बिया घेऊन कुंडीत लावून त्यांना पाणी घातले जाते व बाळरोपे केली जातात. काही बागांतून माळी या बियांचे कठीण कवच मऊ व्हावे, यासाठी पाच मिनिटे बिया गरम पाण्यात ठेवतात, त्यामुळे बी लवकर रुजू शकते. अशा प्रकारे बिया रुजविल्यानंतर त्या रोपवाटिकेतील लहान पिशव्यांमध्ये आरोपित केल्या जातात व कोरड्या मोसमात कायम स्वरूपी जागेत रोपांची लागवड करण्यात येते.

## उपयोग

१) शोभादायी फुलांच्या झुबकेदार दृश्यामुळे प्रवेश द्वाराच्या सौंदर्यात वाढ करण्यासाठी हे झाड प्रामुख्याने लावतात.

२) या झाडाचे लाकूड टणक असल्याने टिकाऊ अशी शेतकी अवजारे, बैलगाडी यासाठी वापरतात.

३) बुंध्याचे लाकूड टॅनिंग उद्योगात वापरतात.

४) आदिवासी जमातीत, प्रामुख्याने संथाल जमातीत फुलांचा उपयोग भाजीसाठी केला जातो.

५) गराचा वापर सौम्य पाचक द्राव्यांत केला जातो. तसेच तंबाखूला विशिष्ट वास देण्यासाठीही वापरला जातो.

६) मुळांचा वापर स्थानिक औषधांत टॉनिक सारखा होतो. तसेच तापनाशक औषधांतही मुळांचा वापर होतो.

**डॉ. मोझेस कोलेट,प्रपाठक**
वनस्पतिशास्त्र विभाग,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.
मराठी भाषांतर - मोहन पाठक, ठाणे

पुस्तक परिचय

# कह्याणी कोयनेची

*कहानी कोयनेची पुस्तकाचा परिचय येथे देत आहोत - संपादक*

'महाराष्ट्राची भाग्य रेषा' अशा विशेषणाने निर्देशिले जाणारे कोयना नदीवरील धरण कसे उभे राहिले असेल. या धरणाच्या उभारणीत जे असंख्यांचे योगदान होते ते कसे होते आणि या धरणाच्या अस्तित्त्वातून निर्माण झालेल्या असंख्य प्रश्नांचे कंगोरे कसे असतील हे जाणून घ्यायचाचे असेल तर प्रा. सौ. उषा तांबे यांचे 'कह्याणी कोयनेची' हे पुस्तक वाचायलाच हवे. वरील सर्व दृष्टिकोन तर महत्त्वाचे आहेतच पण या पुस्तकाच्या रुपाने आणि निमित्ताने महत्त्वाचा दस्तऐवज शब्दबद्ध झाला आहे. अनेक विद्वान आपले विचार प्रत्यक्षात कागदावर उतरवत नाहीत, त्यांच्याबरोबर क्रांतीकारी असू शकणाऱ्या विचारांचा शेवट होतो. तसा तो होऊ नये म्हणून शब्दबद्ध केला जावा याचा आग्रह एका निबंधात मांडताना विचारवंत पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी या विचारांना 'पराधीन सरस्वती' असे म्हटले होते. (निबंधाचे शीर्षकच ते होते) कोयना धरणाची ही ओघवती कहाणी वाचताना एरवी पराधीन राहिलेला हा भाग लेखिकेच्या कष्टांमुळे शब्दबद्ध झाला याबद्दल मन प्रत्येक ओळीशी त्यांना धन्यवाद देत होते.

कोयना नदीवर धरण बांधण्याच्या कल्पनेचा आणि इतिहासाचा पाठपुरावा करीत, प्रत्यक्ष बांधकामाचे वर्णन प्रा. सौ. तांबे करतात. एवढेच झाले असते तर फार महत्त्वाचे ठरले नसते. पण ५०-६०-७० च्या दशकांमध्ये या धरणाबाबत समाजमनात उमटलेल्या उलटसुलट विचारांचा परामर्शही त्यांनी घेतला आहे. धरण हवं म्हणून पाठपुरावा एकीकडे आणि धरणग्रस्तांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने होणारा विरोध दुसरीकडे अशा मतभिन्नतेतूनही प्रकल्प कसा पुढे गेला याचं साक्षेपी वर्णन या पुस्तकात आहे. पृ. ३९ वर तर हरे रामा हरे कृष्णा या चित्रपटातील गाण्याचा संदर्भ देत समाजाने हे किती मोठं काम आपल्यासाठी निर्माण केले आहे याची जाणीव तरुणांनी बाळगायला हवी हा मुद्दा कळकळीने आला आहे.

प्रत्यक्षात धरणाच्या बांधकामाचे गणिती तपशील हा या कहाणीतील आवश्यक भाग होता. मेगॅवॅट वीज, वॅट म्हणजे काय, भूमिगत कामाच्या तपशीलात आलेली अधिक्षक बोगदा, उल्होळ विहीर हे सर्व तपशील माहिती या स्वरुपात येणे अपरिहार्य होते पण ही माहिती देताना 'कह्याणी'चा ओघ कोठेही खंडित होत नाही हे महत्त्वाचे. अभियांत्रिकीचा अभ्यास नसतानाहि हे सर्व समजावून घेणे, ते सोप्या भाषेत व्यक्त करणे हे अवघड काम होते. प्रा. तांबे यांच्या भाषा प्रभुत्वामुळे 'माहिती' तील शुष्कपणा सहज दूर झाला आहे. पृ. ४७ वरील शेवटचा परिच्छेद (या धरणाच्या बांधकामाचं...) या दृष्टीने उदाहरण म्हणून वाचावा. 'रबल कॉंक्रीट' हा शब्दच नवा असणारा वाचक भाषेच्या ओघामुळे ही माहिती सहज वाचतो व जाणूनही घेतो. अभियांत्रिकी वरील ग्रंथात यावा तसा शुष्कपणा, न लागतेपण क्षणभरही जाणवत नाही. हा भाग झाला लेखिकेच्या जिज्ञासेचा आणि भाषा ज्ञानाचा, भाषा वापराच्या हातोटीचा.

पण, या पुस्तकाचे खरे वैशिष्ट्य वेगळेच आहे. एवढा बोलबाला झालेल्या या धरण विषयाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या सर्व उपविषयांचा आणि समाजकारण, राजकारण, अर्थकारण इ. सर्व दृष्टिकोनांचा जो उहापोह प्रा. तांबे करतात त्यामुळे या कहाणीला एक वेगळेपण

प्राप्त होते. शिवाय या विवेचनाच्या ओघाने निरनिराळ्या वृत्तपत्रीय, ग्रंथ, भाषणांतील संदर्भ देऊन या कहाणीची सर्वांगीण अशी विचारधारा वाचकाच्या मनात निर्माण झाली आहे. हे वैशिष्ट्य आहे. धरणग्रस्त, त्यांचे प्रश्न, त्यावरील त्यावेळी काढलेले उपाय, भूकंपाचा प्रसंग, कोयना नगरातील जनजीवन व संस्कृती, इतिहासाच्या काळात डोकावून घेतलेला वेध या सर्वांमुळे 'परिपूर्ण' असे विशेषण या पुस्तकाला लावणे योग्य ठरेल.

पं. जवाहरलाल नेहरू च्या मतांचे संदर्भ आहेत तसे गांधीवादी औद्योगिकीकरणाच्या विरोधातील तत्त्वज्ञानाची चर्चा ही आहे. (पृ. ८६,८७) पृ. ८७ वर तर गांधीवादी विचारांचा समारोप करताना 'घड्याळाचे काटे उलटे कसे फिरवणार' हा विचारांच्या ओघात व्यक्त होणारा प्रश्न व पर्यावरणाच्या संदर्भातही 'रक्षण निसर्गाचं करायचं की माणसाचं' या निरुत्तर करणाऱ्या मूलभूत प्रश्नाच्या संदर्भातील विचार या विषयाला एक वेगळ्या चिंतनाची जोड देतात. १९०० सालापर्यंत मागे जात इतिहासाचा धांडोळा घेता घेता निर्माण झालेल्या या प्रश्नांचा विचार करावासा वाटणं, तो सयुक्तिकपणे करणं व शब्दबद्ध करणं यामुळे मुकुंदराव किर्लोस्करांनी वापरलेल्या 'उपयुक्त पुस्तक' (वाचनीय तर आहेच) हा शब्दसमूह योग्य ठरतो.

प्रा. तांबे यांनी पुस्तक सिद्ध करण्यासाठी कष्ट घेतले. अनेकानेक संबंधितांच्या भेटी घेतल्या हे तर आहेच, पण महत्त्वाचा भाग म्हणजे जिज्ञासा वृत्ती आणि परिपूर्णतेचा ध्यास. केवळ एकाच बाजूचा विचार मांडून त्या मोकळ्या होत नाहीत तर सर्व संबंधित विषयांचा विचार करतात, सुसंगत पद्धतीने मांडतात. १२ लहान लहान प्रकरणात त्यांनी हे पुस्तक विभागले आहे.

धरणांच्या संदर्भात असणाऱ्या अनेक प्रकारच्या साहित्यात, मराठीतून पुस्तक कसं असावं याचा वस्तुपाठ या पुस्तकातून आपल्याला पहायला, वाचायला मिळते. पुस्तक राजहंस प्रकाशनसारख्या व्यावसायिक प्रकाशकांनी काढले आहे. त्यामुळे निर्मितीमूल्य चांगले आहेच. परिशिष्ट (पृ. ११५) मात्र अधिक ठसठशीत हवी होती असे जाणवले. शिवाय परिशिष्टांची संख्या वाढविता येणे शक्य आहे. याचा उपयोग संदर्भासाठी अधिक झाला असता.

कहाणी कोयनेची : उषा तांबे
पुणे, राजहंस प्रकाशन, २००५
पृ. सोळा, १७ ते ११५ मूल्य रु. ७५/-
ग्रंथमागणी क्रमांक - ८१-७४३४-३३८-५

**सौ. मानसी देशमुख**

पृष्ठ क्र. २३ वरून

**माझा शैक्षणिक प्रवास व ग्रंथालये**

मग स्वर्ग शोधण्याची गरज काय? मी तर म्हणेन पृथ्वीवर जर कोठे स्वर्ग असेल तर तो इथेच, ग्रंथालयात आहे!

आज माझे स्वत:चे छोटेसे ग्रंथालय आहे. ज्यात सुमारे अडीचशे पुस्तके असावीत. अत्र्यांच्या कऱ्हेचे पाणी यापासून ते टॉलस्टॉलय पर्यंत पुस्तके जमविण्याचा प्रयत्न केला आहे. उत्तरोत्तर काळात अधिक पुस्तक-संच तयार होऊन स्वत:चे छोटेसे ग्रंथालय निर्माण करण्याची अपेक्षा बाळगत आहे.

संदर्भ
१) विविध लेखकांची पुस्तके
२) ग्रंथालयांचे महत्त्व (मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, वाचनालय, १९७१)

**योगंधरा प्रकाश बढे**
५५६/D-१२, सत्यविजय सोसायटी
सेक्टर-५, चारकोप, कांदिवली (प.)
मुंबई - ४०० ०६७.
दूरध्वनी - २८६८२०४६ (२८६८२०४६)

# पुण्यस्मरण

*रघुनाथ धोंडो कर्वे यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त हे विशेष स्मरण - संपादक*

भारतीय कुटुंबकल्याणचे (पूर्वीचा शब्दप्रयोग 'कुटुंब नियोजन') जनक असे ज्यांचे वर्णन करता येईल त्या रघुनाथराव धोंडो कर्वे यांची संक्रांत ही जयंती. या विषयासाठी व लैंगिक शिक्षणाच्या प्रसारासाठी उभे आयुष्य त्यांनी वेचले. १४ ऑक्टोबर १९५३ रोजी त्या द्रष्ट्या माणसाचे निधन झाले आणि त्यापूर्वी एक वर्षा आधी भारत हा कुटुंबनियोजनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविणारा, कुटुंबाचा आकार मर्यादित रहावा या दृष्टीने प्रयत्न करणारा पहिला देश ठरला. रघुनाथराव कर्वे यांचे चरित्र उत्तमपणे समजावून घ्यावयाचे असेल तर श्री. ज. जोशी यांनी लिहिलेली 'रघुनाथांची बखर' ही कादंबरी अभ्यासणे गरजेचे आहे. १८८२ साली १४ जानेवारीला भारतरत्न महर्षी आण्णासाहेब तथा धोंडो केशव कर्वे यांच्या घरात रघुनाथरावांचा जन्म झाला. धोंडो केशव कर्वे यांच्या करड्या शिस्तीत रघुनाथराव वाढले.

रघुनाथरावांच्या जीवनातील चढउतार, अस्थिरता आणि तो विसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांतील काळ लक्षात घेता रघुनाथरावांच्या कर्तृत्वाचे वेगळेपण समजू शकते. १९२० साली पॅरिसला त्यांनी फ्रेंच ॲकॅडमीची एम.ए. ची पदवी संपादन केली. विद्वत्ता, वक्तृत्व, शिस्त हे सारे गुण असूनही स्वभावातील स्पष्टवक्तेपणा आणि निर्भिडपणे आपली मते मांडणे या विशेषांमुळे प्राध्यापकीच्या नोकरीत ते स्थिरावू शकले नाहीत. त्यात कुटुंबनियोजन व लैंगिक शिक्षण, स्त्री-पुरुष संबंध या विषयांना वाहिलेले 'समाजस्वास्थ' नावाचे मासिक १५ जुलै १९२७ रोजी त्यांनी चालू केले. त्या वेळच्या रूढीप्रमाणे संततिनियमन, लैंगिक शिक्षण हे जाहीरपणे बोलण्याचे विषय नव्हते, आणि रघुनाथराव जाहीरपणे या विषयांवर लिहीत, बोलत असत. त्यामुळे एल्फिस्टन कॉलेज (मुंबई), डेक्कन कॉलेज (पुणे), कर्नाटक कॉलेज (धारवाड), गुजरात कॉलेज (अहमदाबाद), विल्सन कॉलेज (मुंबई) या महाविद्यालयातील गणित या विषयाचे अध्यापन करण्याच्या सर्व नोकऱ्या अस्थिर ठरल्या, कायम प्रवास नशिबी आले. स्वाभाविकपणे इतर लहानमोठे व्यवसाय आजमवावे लागले.

१९२१ साली लग्न झाल्यावर संततिनियमनाचा विचार स्वत:च्या कुटुंबापासूनच अंमलात आणला. संततिनियमनाचे व्यापक उद्दिष्ट समाजाचे स्वास्थ असून संततिनियमनाची यशस्विता स्त्री पुरुषांतील निकोप संबंधावर अवलंबून आहे, हा काळाच्या पुढचा विचार ठामपणाने, आग्रहाने ते मांडायचे. कोठल्याही प्रकारचे आर्थिक वा सामाजिक पाठबळ नाही आणि स्वत:च्या व्यावसायिक जीवनात कमालीची अस्थिरता आहे अशा अवस्थेत आयुष्याच्या शेवटापर्यंत निग्रहीपणे त्यांनी समाजस्वास्थ्य मासिक चालवले. समाजस्वास्थ्य लोक वाचायचे पण उघडपणे तसे कबूल करताना वा रघुनाथरावांच्या विचारांना पाठिंबा देताना मात्र घाबरायचे. या वातावरणाचा रघुनाथरावांना सहन करावा लागलेला ताप व झालेला मनस्ताप याची कल्पना करता येणे अवघड आहे.

विचारांतील तार्किकता, स्पष्टपणा आणि विचारांना असणारी भक्कम वैज्ञानिक बैठक त्यांच्या लेखनाचा विशेष भाग होता. संततिनियमन, गुप्तरोग अशी पुस्तके तर त्यांनी

लिहिलीच पण कामशास्त्र, वेश्याव्यवसाय, आहारशास्त्र असा विषयांवरही त्यांनी पुस्तके लिहिली. त्यांच्या या विषयांवरील विचारांची दखल त्यावेळच्या समाजाने घेतली असती तर विसाव्या शतकाच्या शेवटच्या टप्प्यात डोके वर काढणाऱ्या एडस्‌सारख्या समस्येचा प्रश्न उद्‌भवलाही नसता.

रघुनाथरावांनी शास्त्रीय विषयांवर लेखन केले, त्याप्रमाणेच गुरुबाजी, न्यायाचा शोध अशी काही नाटकेही लिहिली. प्रवाहाच्या विरुद्ध पोहणारा द्रष्टा समाजसुधारक त्यांच्या रूपाने महाराष्ट्रात होऊन गेला. या जानेवारीत त्यांची १२५ वी जयंती आहे. त्यांच्या जयंतीनिमित्ताने हे विशेष स्मरण।

**अविनाश गायतोंडे**
सोमवार बाजार,
मालाड, मुंबई

दिशा
नियमित वाचा

**पृष्ठ क्र. २४ वरून**

**गीताई - विनोबा**

त्या पवित्र कुरुक्षेत्री पांडुचे आणि आमुचे
युध्दार्थ जमले तेव्हां वर्तले काय संजया॥१.१

नको जय नको राज्य नकोत मज ती सुखे
राज्यें भोगें मिळे काय किंवा काय जगूनि ही ॥१.३२

- अध्याय १५ वा - उर्ध्वमूल मधस् शाखं.... ह्या श्लोकाचा हा अनुवाद पहा - श्रीभगवान म्हणाले -

खाली शाखा वरी मूळ नित्य अश्वत्थ बोलिला
ज्याच्या पानांमधें वेद जाणे तो वेद जाणतो ॥१५.१

अत्यंत गूढ हे शास्त्र निर्मळा तुज बोलिलो
हे जाणे तो बुध्दिमंत होईल कृतकृत्य चि॥१५.२०

- अध्याय १८ वा - शेवटचा श्लोक 'यत्र योगेश्वर कृष्ण.....

योगेश्वर जिथे कृष्ण जिथे पार्थ धनुर्धर
तिथे मी पाहतो नित्य धर्म श्री जय वैभव ॥१८.७८

गीतेची आता बरीच समश्लोकी भाषांतरे झाली आहेत. पण 'गीताई' हा पहिलाच मराठी समश्लोकी अनुवाद असावा, त्यावेळी गीतेइतकीच 'गीताई' ही लोकप्रिय होती. 'गीताप्रवचने' व 'गीताई' लिहून विनोबाजींनी गीता सर्वसामान्यापर्यंत नेऊन पोचवली.

'गीताई' हे पॉकेट बुक आहे. कुठेही नेता येण्यासारखे. पाहाच एकदा 'गीताई' हातात घेऊन अनुभवून.

**आशा भिडे**
बी/१ विजय अपार्टमेंटस्
'आराधना' टॉकीजजवळ
ठाणे (प) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०

# परिसर वार्ता

परिसर वार्तासाठी घडामोडींची माहिती महिन्याच्या दहा तारखेपर्यंत मंडळाच्या कार्यालयात येणे आवश्यक आहे. नंतर आलेली माहिती पुढील अंकात घेतली जाईल-संपादक

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

दरवर्षीप्रमाणे शाळेत शारदोत्सव उत्साहात साजरा झाला. त्यानिमित्त शाळेत रांगोळी स्पर्धा आणि भोंडला गीतगायन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

स्पर्धा आणि विजेते पुढीलप्रमाणे

१) रांगोळी स्पर्धा (पाना-फुलांची रांगोळी)

प्रथम क्रमांक : ५ अ - कु. चैताली सावंत
कु. तन्वी सावंत

९ अ - कु. मोनाली धरणकर

द्वितीय क्रमांक : १०अ - कु. दीपाली शिंदे

२) भोंडलागीत गायन स्पर्धा

प्रथम क्रमांक : इ. १० अ सहभागी सर्व विद्यार्थिनी

या विद्यार्थिनींनी पारंपरिक गीतात बदल करुन नवीन संदर्भ असलेले भोंडला गीत सादर केले.

द्वितीय क्रमांक : इ. १० अ सहभागी सर्व विद्यार्थिनी कार्यक्रमाचे नियोजन सौ. अपर्णा भट, सौ. सुषमा बोऱ्हाडे, सौ. पुनम देवघरे यांनी केले.

विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षकही शालाबाह्य उपक्रमांत भाग घेऊन पारितोषिके मिळवितात.

२२ ऑक्टोबर ०६ रोजी दिवाळीच्या सुट्टीत इ. ९ वी च्या संस्कृतच्या अभ्यासक्रमावर आधारित शिबिरात शिक्षकांच्या स्पर्धेत आपल्या शाळेचे श्री. धोंडे यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या स्पर्धेत सर्व संवाद संस्कृत भाषेतून करावयाचा होता.

दैनिक सकाळतर्फे आयोजित 'रंगोत्सव' या रांगोळीच्या स्पर्धेत आपल्या शाळेतील सौ. मंजिरी दांडेकर यांना प्रथम पारितोषिक मिळाले.

शालाबाह्य उपक्रमांतील विद्यार्थ्यांचे यश

१) 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व संस्कार भारती, कळवा शाखा' यांच्या संयुक्त विद्यमाने १९ ऑक्टोबर'०६ रोजी 'पर्यावरण' विषयावर घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेत कु. सात्विक पेणकर - १० अ यास द्वितीय क्रमांकाने रु. १०००/- चे रोख पारितोषिक प्राप्त झाले.

२) डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा इ. ६ वी तील ३५ विद्यार्थ्यांपैकी तीन विद्यार्थ्यांची प्रयोग परीक्षेसाठी निवड करण्यात आली.

१) अभिषेक घरत
२) शुभम कोयंडे
३) ऋतुजा चंद्रराव

३) पर्यावरण मंचातर्फे २० नोव्हें. ०६ रोजी आयोजित केलेल्या निसर्ग मेळाव्यात कु. अभिषेक नेने- ७ बी आणि अजित साळुंखे -८ अ यांना 'झाडे ओळखा' स्पर्धेत पुस्तक रुपाने पारितोषिक मिळाले.

४) ठाणे शहर कॉंग्रेस कमिटी आणि स्वामी विवेकानंद कमिटीतर्फे घेण्यात आलेल्या 'किल्ला' स्पर्धेत तन्मय वाडेकर - ७ अ यास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक (प्रमाणपत्र व घड्याळ) मिळाले.

५) २५ नोव्हें. रोजी गोवा येथे झालेल्या 'गोवा कराटे चॅम्पियनशीप' स्पर्धेत सागर पांडुरंग चव्हाण - ६ अ यास अनुक्रमे गोल्ड मेडल व सिल्व्हर मेडल मिळाले.

६) १ व २ डिसें.'०६ रोजी ठाणे जिल्हा एन्.टी. केळकर चषकासाठी घेण्यात आलेल्या आंतरशालेय क्रिकेट सामन्यात आपल्या शाळेतील १६ वर्षांखालील मुलांचा संघ उपविजयी झाला. या सामन्यातून प्रणव टिल्लू १० ड, ऋषिकेश देव - १० ब यांची मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या 'पट्कार' संघासाठी निवड करण्यात आली.

७) वि.प्र. मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. मा.य. गोखले यांच्या मातोश्रींच्या स्मृतीप्रीत्यर्थ वि.प्र. मंडळ ठाणे आयोजित 'जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा' २६ नोव्हें. '०६ रोजी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नंदकिशोर दळवी - ९अ, प्राजक्ता शिंदे- ९ अ, पल्लवी राणे - ७ अ या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिके (प्रमाणपत्र व रोख रु. ५०/-) मिळाली.

## पूर्व प्राथमिक विभाग

२००६ ते २००७ मध्ये पूर्व प्राथमिक विभागाचा क्रीडा महोत्सव झाला. त्यात रांगेत जाणे, विटांवरून नागमोडी चालणे, बादलीत चेंडू टाकणे, पीठातून पैसे शोधून काढणे अशा विविध स्पर्धा मैदानात घेण्यात आल्या.

त्यानंतर स्नेहसंमेलन झाले, त्यावेळी मंडळाचे सभासद मा.श्री. करंदीकर साहेब, मा. श्री. पाटील साहेब, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. केळकरबाई,




प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. वाघरेबाई उपस्थित होत्या. त्यावेळी स्नेहसंमेलनाला 'या सुखांनो या' फेम कु. मृण्मयी फडके हिला प्रमुख पाहुणी म्हणून बोलावले होते. तिची मुलाखत आमच्या मोठ्या शिशुतील बालदोस्तांनीच घेतली. क्रीडा महोत्सवाची पारितोषिके तिच्या हस्ते वितरित केली. तसेच मोठ्या शिशुतील पाचही गटांतून सर्वप्रथम आलेल्या कु. मानसी नितीन पाटील हीस पारितोषिक देण्यात आले.

कु. मृण्मयी फडके हिने एक नाट्यछटा व कथ्थक नृत्य करून दाखवले. मुख्याध्यापिका सौ. वैद्यबाईंनी स्नेहसंमेलनासाठी 'चंद्र व चांदण्या' हा विषय दिला होता. त्यानुसार शिक्षिकांनी वेगवेगळे नाच बसवले होते. सगळ्यांनाच कार्यक्रम फार आवडला. स्नेहसंमेलनाप्रीत्यर्थ पूर्व प्राथमिक विभागातील सर्व मुलांना अल्पोपाहार देण्यात आला.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

१. कै. श्री बाळू बाकरे संगीत स्पर्धा -

| | | |
|---|---|---|
| तबला | कु. वरद गोखले | प्रथम पारितोषिक |
| हार्मोनियम | कु. निनाद ताकभाते | प्रथम पारितोषिक |
| गायन | कु. मधुरा जोशी | प्रथम पारितोषिक |

२. जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| प्रथम गट | कु. नेहा पुसाळकर | द्वितीय क्रमांक |
| द्वितीय गट | कु. मधुरा गोडबोले | उत्तेजनार्थ |

३. राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेकडून प्रकल्पाची निवड - Study of Insects on the trees in our surroundings ह्या आपल्या शाळेच्या प्रकल्पाची गंगटोक सिक्कीम येथे होणाऱ्या राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेत सादर करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे.

**सहभागी विद्यार्थी -** प्रियज नागर (गट प्रमुख), अद्वैत रणदिवे, सिमरन भांगले, रिया दाते आणि प्राची जैस्वाल.

४. डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा २००६-२००७ चा निकाल :

इ. ९ वी

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी : १९

प्रमाणपत्रासाठी निवड झालेले विद्यार्थी : ७

प्रयोग परीक्षेसाठी निवड झालेले विद्यार्थी : ८

इ. ६ वी

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी : ४४

प्रमाण पत्रासाठी निवड झालेले विद्यार्थी : ११

प्रयोग परीक्षेसाठी निवड झालेले विद्यार्थी : ११

अमित पाटणकर या विद्यार्थ्याने ८० गुण मिळवून मुंबई विभागात द्वितीय क्रमांक पटकवला.

५. जिज्ञासा ट्रस्ट आयोजित आंतरशालेय विज्ञान प्रश्नमंजुषा - कु. ओजस गोहाड आणि कु. अमला भागवत या जिज्ञासा ट्रस्ट आयोजित राज्यस्तरीय विज्ञान प्रश्नमंजुषेत विजयी ठरल्या. त्यांना रु. ५००० चे रोख पारितोषिक तसेच वैयक्तिक ट्रॉफी व शाळेसाठी एक ट्रॉफी मिळाली.

## प्राथमिक विभाग

१. श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठन स्पर्धा :

१. कु. अदिती गोखले - ४ थी 'अ' - प्रथम क्रमांक

२. कु. ओमकार गोखले - ३ री 'अ' - तृतीय क्रमांक

३. अंबरीश बिवलकर व आकाश रोकडे यांस उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.

२. संस्कृती कला दर्पण - विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.




**श्री. करंदीकर यांच्या हस्ते पारितोषिक स्विकारताना कु. अदिती गोखले**

१. सुंदर हस्ताक्षर स्पर्धा - ३री 'ब' - प्रथम क्रमांक - नेहा केळकर.

२. निबंध स्पर्धा - ४थी 'ब' - द्वितीय क्रमांक - अनुजा मुसळे

३. चित्रकला स्पर्धा - ३री 'अ' तृतीय क्रमांक - केतन दामले

३. इयत्ता ३री 'ब' मध्ये शिकणाऱ्या गायत्री पटवर्धन हिला संस्कार भारती तर्फे आयोजित केलेल्या नृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले.

४. सुखाणी ज्ञानमंदिर तर्फे आयोजित केलेल्या संस्कृत श्लोक पठण स्पर्धेत प्रथम व संस्कृत कथा कथन मध्ये द्वितीय पारितोषिकाची मानकरी ठरली ३री 'ब' मधील कु. इशा पुणतांबेकर.

५. टाइम्स ऑफ इंडिया तर्फे आयोजित केलेल्या बॅटमिंटन स्पर्धेत इयत्ता ३री 'ब'ची नेहा दीक्षित हिची जिल्हा स्तरावर निवड झाली.

६. ३री 'ब' मधील आर्या दातार हिस राज्यस्तरावर व जिल्हा स्तरावर कराटे चॅम्पियनशीप मध्ये सुवर्ण, रौप्य व कास्य पदके मिळाली. शोटोकोन कराटे अॅकेडमी तर्फे ह्या स्पर्धा घेतल्या गेल्या होत्या.


कु. आर्या दातार


कु. वैष्णवी देसाई

७. १ली 'क' मधील कु. आदित्य दातार ह्यास बुध्दिबळ स्पर्धेमध्ये ट्रॉफी मिळाली. मुंबई चेस असोसिएशन तर्फे स्पर्धा आयोजित केली होती.

८. २री 'क' मधील कु. वैष्णवी देसाई हिस मुंबई यंग मेंबर क्लब असोसिएशन तर्फे आयोजित जलतरण स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक मिळाले.

## पूर्व प्राथमिक

विद्या प्रसारक मंडळाच्या ए.के.जोशी शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागात वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात.

सर्व सण उत्साहात साजरे होतात. प्रत्येक सणाला काहीतरी नावीन्यपूर्ण गोष्ट करून तो दिवस विशेष बनवण्याकडे सर्वांचा कल असतो.

या शैक्षणिक वर्षातील पहिला कार्यक्रम म्हणजे **'पालक-शिक्षक सभा'** या जूनमध्ये नवीन आलेली म्हणजेच ज्यूनी. के. जी. च्या सर्व पालकांची एकत्रितपणे घेतलेली सभा. या सभेत सर्व शिक्षकांची तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ओळख करून देण्यात आली. पूर्व प्राथमिक विभागात आम्ही 'हसत-खेळत शिक्षण' या पद्धतीचा अवलंब का केला? आणि बालकांच्या या वयात हीच पद्धत कशी सर्वोत्तम आहे, याबद्दल आमच्या विभागाच्या प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी पालकांना मार्गदर्शन केले. नंतर सर्व पालकांनी सर्व वर्गात फिरून शिक्षकांशी चर्चा केली.

यानंतरचा दुसरा कार्यक्रमही **ज्यूनीयर के.जी.च्या पालकांसाठी** होता. ज्यूनी. तसेच सीनीयर के.जी.च्या पूर्ण दोन वर्षात मुलांना कुठला अभ्यासक्रम, कुठल्या पद्धतीने शिकवला जाणार आहे, याचे मार्गदर्शन शिक्षिकांनी पालकांना केले. पालकांनीही यात उत्स्फूर्तपणे भाग घेऊन, शिक्षकांना सहकार्य केले. ही कार्यशाळा दोन सलग शनिवार घेण्यात आली. यानंतर सणांची चाहूल लागली होती, तशी आमच्याही तयारीला सुरुवात झाली. ६ जुलैला **आषाढी एकादशी** साजरी केली. ज्यूनी. आणि सीनी. के. जी. च्या प्रत्येकी ५ वर्गातील मुलांनी शिक्षकांसोबत प्रत्येक वर्गाचे एक अशा १० झाडांचे वृक्षारोपण केले. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' हा संकेत या नवीन पिढीत रूजावा हा यामागचा हेतू होता.

२८ जुलैला **नागपंचमी** साजरी केली गेली. विशेष म्हणजे मुलांनी स्वत:च राख्या तयार केल्या होत्या. सर्वांनी एकमेकांना राख्या बांधल्या. शाळेतर्फे मुलांना नारळाची वडी खाऊ म्हणून देण्यात आली. शिक्षकांसोबत शाळेच्या आवारातील झाडाझुडपांना मुलामुलींनी राख्या बांधल्या. झाडेसुद्धा आपले मित्रच आहेत, आपण त्यांचीसुद्धा काळजी घेतली पाहिजे, हे यातून मुलांना सांगण्यात आलं.

१३ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनानिमित्त ज्यूनी. के.जी. च्या मुलांना देशभक्तीपर गीते शिकवण्यात आली. सीनीयर के.जी. च्या मुलांना झेंड्यात असणाऱ्या तीनही रंगांच्या पट्ट्या कापून दिल्या आणि शिक्षकांच्या मदतीने मुलांनी झेंडे तयार केले. स्वत: केलेला झेंडा हातात घेऊन मुलांनी देशभक्तीपर गाणी गायली.

१४ ऑगस्टला सर्वांनी जोषात साजरी केली, 'दहिहंडी'! काही मुलामुलींची हंडी फोडण्यासाठी निवड करण्यात आली. इतरांनी 'गोविंदा रे गोपाळा, यशोदेच्या तान्ह्या बाळा' म्हणत त्यांना प्रोत्साहन दिले. सर्व मुलांनी आनंदाने, उत्साहाने गोविंदा खेळत होती. कृष्ण झालेल्या एका मुलाने हंडी फोडली, नंतर शिक्षकांनी दहिपोह्यांचा प्रसाद सर्वांना वाटला.

काहीच दिवसात श्रीगणरायाचे आगमन होणार होते. **'गणेश उत्सव'** शाळेत पूर्ण आठवडाभर साजरा केला गेला.

१) पहिल्या दिवशी (सोमवार २१ऑगस्ट) मुलांना गणपतीच्या गोष्टी आणि गाण्यांची व्ही.सी.डी. दाखवण्यात आली.

२) दुसऱ्या दिवशी (मंगळवार २२ ऑगस्ट) गणपतीची गाणी शिक्षकांनी मुलांना शिकवली. जवळच असलेल्या गणपतीच्या कारखान्यात सर्व मुलांना नेऊन आणण्यात आले.

३) तिसऱ्या दिवशी (बुधवारी २३ ऑगस्ट) मुलांना चिकणमाती देण्यात आली. त्यापासून त्यांनी गणपती, उंदीर, मोदक याच्या उत्तम प्रतिकृती तयार केल्या.

४) चवथ्या दिवशी (गुरूवार २४ ऑगस्ट) सर्व मुले रंगीबेरंगी कपडे घालून, आनंदात शाळेत आली, कारण आज गणपतीबाप्पा. शाळेत येणार होता ना! हातात झांजा घेऊन मुखाने गणरायाचा गजर करत 'श्रीगणेशाचे' शाळेत आगमन झाले. मुलांनी शिक्षकांसोबत गणपतीची पूजा, आरती केली. काही मुलांनी गणपतीस्तोत्र, गणपतीचे श्लोक म्हटले. मुलांना प्रसाद म्हणून एक एक उकडीचा मोदक देण्यात आला.

५) पाचव्या दिवशी (शुक्रवार २५ ऑगस्ट) गणपती विसर्जन. एका बादलीत पाणी घेऊन त्यात शिक्षकांनी गणपतीचे विसर्जन करून दाखवले. शाडूची मूर्ती असल्याने ती विरघळून मातीचा थर खाली बसला. त्यामुळे तलाव कसे खराब होतात; पर्यावरणावर कसा परिणाम होतो. हे मुलांना सांगितले, याकरताच घरीही शाडूचीच मूर्ती आणून घरीच त्याचे विसर्जन करावे, असा संदेश या उद्याच्या पिढीला देण्याचा प्रयत्न आम्ही केला.

याच दरम्यान मुलांना गणपती कसे तयार करतात, हे दाखवण्यासाठी कारखान्यात नेण्यात आले. अनेक रूपरंगातील गणपती मुलांनी बघीतले.

याच आठवड्यात 'जिज्ञासा' संस्थेचे श्री. दातार सर यांनी चिकणमातीपासून गणपती कसा बनवतात याचे शिक्षकांना मार्गदर्शन केले. एकूणच गणपती उत्सव आठवडाभर भरगच्च कार्यक्रमांनी साजरा झाला.

**दिवाळी** - ऑक्टो. ०६ मध्ये रोजी दिव्यांच्या लखलखाटात दिवाळी साजरी झाली. शिक्षकांनी सर्व मजला दिवाळीच्या दरम्यान वापरल्या जाणाऱ्या वस्तूंनी (पणत्या, फुले, फराळ, फटाके) सजवला. सीनीयर के. जी. च्या सर्व मुलांनी प्रत्येकी एक छोटी पणती रंगवून सजवली होती, तर ज्यूनीयर के. जी. च्या मुलांनी पणतीसाठी वाती तयार केल्या. सर्व मुले रंगीबेरंगी कपडे घालून शाळेत आली. सनईच्या सुरांनी वातावरण मंगलमय झाले होते. प्रत्येक वर्गात मधोमध पणत्या लावून सभोवती फुलांची रांगोळी काढण्यात आली.

या दिवाळीच्या उत्सवात आम्ही बेडेकर मराठी शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागाच्या काही मुलांना बोलावले. इतर शाळेतील मुलांशी मिळून मिसळून वागण्याची एक संधी या निमित्ताने मुलांना मिळाली. एकाच संस्थेच्या दोन्ही शाळांनी एकत्रीतपणे उपक्रम करण्याचा एक प्रयत्न.

नंतर पणत्या लावून, दिवाळीची गाणी म्हटली. मुलांना चकली, चिवडा व लाडू असा दिवाळीचा खाऊ देण्यात आला. एकत्र बसून मुलांनी फराळाचा आस्वाद घेतला.

दिवाळीच्या सुटीनंतर शाळा चालू झाली. यानंतर सीनीयर व ज्यूनी. के. जी. च्या **सहली** ११ नोव्हेंबर व १७ नोव्हेंबर रोजी ओवळा येथील 'श्रद्धा गार्डनस्' मधे नेण्यात आल्या. मुलांना शाळेतर्फे ब्रेड, बटरचा नाश्ता देण्यात आला. झोपाळा, घसरगुंडी या सर्वांवर मुले भरपूर खेळली. शिक्षकांनी परिसरांतील झाडांविषयीची माहिती मुलांना करून दिली. दुपारी ४च्या सुमारास सुखरूप शाळेत परतलो.

१ डिसें. ०६ रोजी शाळेत 'मार्केट'चे आयोजन करण्यात आले होते. सीनीयरच्या मुलांना त्यांच्या गणित विषयात चलनात असणाऱ्या नोटा व नाणी यांचा परिचय करून दिला जातो. तसेच बाजारात जाऊन खरेदी कशी करायची याचे मार्गदर्शन केले जाते. काही मुलांनी शिक्षकांबरोबर दुकानदाराची भुमिका केली, तर इतर सर्व मुलांनी गिऱ्हाईकाची भूमिका पार पाडली. मुलांना आवडणाऱ्या खाऊच्या आणि खेळाच्या वस्तू यात विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या.

५ डिसें. ०६ रोजी **चीन** या देशातील काही अभ्यासक आमची शाळा बघण्यासाठी आले होते. त्यांना आमची 'हसत-खेळत शिक्षणपद्धती' फारच आवडली.

१५ डिसेंबरला शुक्रवारी आम्ही एक आगळावेगळा कार्यक्रम साजरा केला तो म्हणजे **'आजी-आजोबा दिवस'**. हल्ली मुलांच्या जडणघडणीत जास्तीत जास्त वाटा उचलणाऱ्या या आजी-आजोबांसाठी थोडा वेळ विरंगुळा! सर्व आजी-आजोबांचे अत्तर लावून व गुलाबजल उडवून स्वागत करण्यात आले. नातवंडांनी केलेल्या कागदाच्या नक्षीकाम केलेल्या बॅगा त्यांना भेट म्हणून दिल्या गेल्या. मनोरंजनाच्या कार्यक्रमात आमच्याच शाळेतील आजी-माजी विद्यार्थ्यांनी जुन्या-नव्या मराठी गाण्यांची सुरेल मैफल सादर केली. आमच्या शाळेतील संगीत शिक्षिका सौ. वीणा जोशी यांचे मार्गदर्शन या कार्यक्रमाला लाभले होते. आजी-आजोबांना गुलाबजाम, उपमा व कॉफी असा अल्पोपहार देण्यात आला. सर्व आजी-आजोबांकडून कार्यक्रम आवडल्याच्या बोलक्या प्रतिक्रिया आम्हाला ऐकायला मिळाल्या.

२३ डिसें. रोजी आम्ही **नाताळ** साजरा केला. मुलांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नाताळदरम्यान घातल्या जाणाऱ्या शंकुच्या आकाराच्या टोप्या तयार केल्या. मुलांनी त्या दिवशी विविध रंगी कपडे घातले होते. माध्यमिक विभागातील एक मुलगा सांताक्लॉजचा वेश परिधान करून आला होता. मुलांच्या आवडत्या सांताक्लॉजने त्यांना टोप्या भेट म्हणून दिल्या, तर खाऊ म्हणून केक दिला. मुलं सांताला समोर प्रत्यक्ष बघून खूप खूश झाली.

आमच्या शाळेत विविध प्रकारे सण साजरे केले जातातच, त्याचप्रमाणे विषयाला अनुसरून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळावा याकरता 'फील्ड ट्रीपसचे' आयोजन केले होते.

१) जेव्हा फळं, भाज्या हा विषय शिकवत असताना मुलांना आम्ही गावदेवी भाजी मंडईत भाज्या, फळे दाखवायला नेले होते.

२) दुकानांविषयीची अधिक माहिती देण्यासाठी शाळेच्या जवळपास असलेली दुकाने मुलांना दाखवण्यात आली. त्यात कपड्याची, दागिन्यांची अशी वेगळ्या प्रकारची किती दुकाने आहेत याची मोजणी करून आलेख तयार करवण्यात आला.

३) वाहनांचा विषय शिकवताना मुलांना जवळपास बघायला मिळणारी वाहने प्रत्यक्ष दाखवण्यात आली.

४) फुलांविषयी अधिक माहिती मुलांना व्हावी याकरता एक फुल विक्रेत्यास शाळेत बोलावले होते. त्याने विविध फुले वापरून बुके, सजावटी करून दाखवल्या. मुलांनी या सर्वांचा आनंद प्रत्यक्ष अनुभवता आला.

अशा प्रकारचे अनेक उपक्रम वर्षभर शाळेत चालू असतात. 'हसत-खेळत शिक्षण' पद्धतीत प्रत्यक्ष अनुभव देण्याकडे आमचा सर्वांचा जास्तीत जास्त भर असतो. तो अनुभव घेत असताना मुलांचे आनंदी चेहरे बघून व नंतर त्यांच्या बोलक्या प्रतिक्रिया पालकांकडून जेव्हा ऐकायला मिळतात, तेव्हा खऱ्या अर्थाने आमचे उपक्रम यशस्वी होत असल्याचा आनंद आम्हा शिक्षक वर्गाला निश्चितच होतो.

**सौ. प्रीती कुलकर्णी**

### बा. ना. बांदोडकर विज्ञान

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष विज्ञान शाखेत, रसायनशास्त्र विभाग शिकत असलेल्या कु. अमृता शालिग्राम हिचा वैद्यराज मासिकाच्या मुखपृष्ठावर फोटो प्रसिद्ध झाला. तृतीय वर्ष, संख्याशास्त्र विभागात शिकत असलेल्या कु. देवयानी देशमुख हिने विजु माने दिग्दर्शित "गोजिरी" या मराठी चित्रपटात अभिनय केला आहे.

प्राणिशास्त्र विभागात शिकत असलेल्या कु. मनस्वी गोंधळी, कामाक्षी नायक आणि कु. पूर्वा आचरेकर या तिघीजणींना एस.आय.इ.एस कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स तर्फे दिनांक २१ व २२ नोव्हेंबर २००६ रोजी घेण्यात आलेल्या "सर्वायवल ऑफ द फिटेस्ट" (Survival of the Fittest) या आंतर-महाविद्यालयीन इव्हेंटमध्ये तृतीय पारितोषिक मिळाले.

सांख्यिकी या संघटनेतर्फे "करिअर इन स्टॅटिस्टीक्स" या विषयावर दिनांक ११ व १२ नोव्हेंबर २००६ रोजी दोन दिवसाची कार्य शाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेत **"क्वीझ कॉन्टेस्ट"** हा एक इव्हेंट होता. या इव्हेंटमध्ये ११० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष विज्ञान शाखेत, संख्याशास्त्र विभागात शिकत असलेल्या कु. विचिथ थाय्या आणि कु. राम्मागन वर्मा या दोन विद्यार्थ्यांना प्रथम पारितोषिक मिळाले.

'फ्रेंडस ऑफ लायब्ररी या संघातर्फे दिनांक १५ व १६ डिसेंबर २००६ ला दोन दिवसांचे "पुस्तक प्रदर्शन" महाविद्यालयाच्या ग्रंथालयात भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या उपप्राचार्या श्रीमती मीरा अकोलकर यांच्या हस्ते झाले.

विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील वाचनसाहित्याची माहिती व्हावी हा या प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश होता. या प्रदर्शनात विविध विषयांवरील पुस्तके, संदर्भ ग्रंथ, विश्वकोश, मराठी व इंग्रजी पुस्तके संयुजाचे अंक प्रदर्शित करण्यात आले. प्रदर्शनाला मोठ्या संख्येने विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### वि. प्र. मं. चे तंत्रनिकेतन

#### "जिओ-इन्फॉमैटिक्स" ...संस्मरणीय चर्चासत्र

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात दिनांक ८ आणि ९ डिसेंबर २००६ रोजी, 'जिओ-इन्फॉमैटिक्स' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्राला डिपार्टमेंट ऑफ इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी नवी दिल्ली, इंडिया स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इसरो) बंगलोर, लाव्हासा कॉर्पोरेशन मुंबई, महाराष्ट्र तंत्रनिकेतन मंडळ मुंबई यांचे प्रायोजकत्व लाभले होते. दोन दिवस चाललेल्या या चर्चासत्रात आय.आय.टी. पवई, इसरो, सर्व्हे ऑफ इंडिया भाभा अणूशक्ती संशोधन केंद्र, लाव्हासा कार्पोरेशन, महाराष्ट्र टेलिफोन निगम, सिमेन्स इंडिया लिमिटेड तसेच बृहन्मुंबई पोलिस, मुंबई महानगर पालिका, सामाजिक वनीकरण विभाग अशा अनेक मान्यवर शैक्षणिक संस्थामधील संशोधक, शास्त्रज्ञ, अभियंते, प्राध्यापक यांचे २४ शोधनिबंध वाचले गेले. ऑस्ट्रेलिया आणि जर्मनी मधील दोन शोधनिबंधाचाही यात समावेश होता.

८ डिसेंबर २००६ रोजी या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाप्रसंगी डॉ. व्ही. के. धडवाल, डीन, इंडिया रिमोट सेंसिंग, डेहराडून यांचे बीजभाषण झाले. उद्घाटनासाठी श्री. एम्. एन्. चैनी, प्रेसिडेंट, कॉर्पोरेट अफेअर्स, रिलायन्स इंडस्ट्रीज, प्रो. बी. पी. ताले, संचालक, महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई उपस्थित होते. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान डॉ. व्ही. व्ही. बेडेकर, चेअरमन विद्या प्रसारक मंडळ यांनी भूषविले. या परिषदेनिमित्त आयोजित केलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन पाहुण्यांच्या हस्ते झाले.

या दिवशीच ठाण्यातील पहिली स्वयंचलित वेधशाळा विद्या प्रसारक मंडळ तंत्रनिकेतनाच्या परिसरात कार्यान्वित झाली. भारतीय हवामान खात्यामार्फत ठाणे

शहरात अशी वेधशाळा बसविण्यात यावी यासाठी विद्या प्रसारक मंडळ तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. डी. के. नायक आणि इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या प्रमुख, प्रा. सौ. कीर्ती आगाशे यांनी विशेष पुढाकार घेतला. ८ डिसेंबर




**प्राचार्य डी.के. नायक, डॉ. व्ही. के. दढवाल, श्री. एम्. एन्. चैनी, डॉ. व्ही. व्ही. बेडेकर, प्रो. बी. पी. ताले, प्रा. कीर्ती आगाशे**

पासून दर तासाचा, ठाणे शहराचा हवामानाचा अंदाज, 'कल्पना-१' या सॅटेलाईट मार्फत पुणे वेधशाळेकडे पाठविण्यास सुरुवात झाली आहे. या चर्चासत्राच्या निमित्ताने ठाणे शहराचा हा कायम स्वरूपी ठेवा होणार आहे.

उद्घाटन सोहळ्यासाठी डॉ. माधव कुलकर्णी, आय.आय.टी. पवई संगणकतज्ज्ञ श्री. अच्युत गोडबोले, ठाणे पोलिस ए.सी.पी. श्री. गायकवाड, सामाजिक वनविभाग अधिकारी श्री. के. डी. ठाकरे, विद्या प्रसारक मंडळाचे मान्यवर कार्यकारी सदस्य, विद्या प्रसारक मंडळ संस्थाचे प्राचार्य, शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

'जिओ-इन्फॉर्मैटिक्स' विषयावरील प्रदर्शनात, लॉरेन्स अँड मेयो, आई मिल, आशिदा इलेक्ट्रॉनिक्स, आय्.आय्.टी पवई, विद्या प्रसारक मंडळ तंत्रनिकेतन यांचे अनेक प्रतिनिधी दर्शकांना विविध उपकरणे, तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर, प्रोजेक्ट यांची माहिती देत होते. सामाजिक वनीकरण विभागाचा यातील समावेश उल्लेखनीय होता.

९ डिसेंबर रोजी चर्चासमापी सत्रात आय्.आय्.टी. पवईचे डीन डॉ. प्रभाकर शेवगांवकर आणि प्रसिद्ध संगणकतज्ज्ञ श्री. अच्युत गोडबोले विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. 'जिओइन्फॉर्मेटीक्स' सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केल्याबद्दल त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. वर्षभर हे चर्चासत्र यशस्वी होण्यासाठी निमंत्रक श्री. डी. के. नायक, कार्यकारी सचिव, प्रा. कीर्ती आगाशे आणि विद्या प्रसारक मंडळ तंत्रनिकेतनाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी केलेल्या या भरीव कामगिरीचे सर्व मान्यवरांनी अभिनंदन आणि कौतुक केले.

## सुषमा कुलकर्णी यांना पुरस्कार

विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील वरिष्ठ व्याख्यात्या सौ. सुषमा श्री. कुलकर्णी यांना आय्.एस्.टी.ई. (दिल्ली) यांच्यातर्फे त्यांच्या एम्.टेक्. च्या संशोधनकामाबद्दल राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या संशोधनाचा विषय "न्युमेरिकल टेक्निक्स् इन हायव्होल्टेज इंजिनिअरींग" असा होता. हा पुरस्कार त्यांना २००६ या शैक्षणिक वर्षासाठी देण्यात आला. असे पुरस्कार दरवर्षी आय्.एस्.टी.ई. या संस्थेतर्फे इंजिनिअरींग क्षेत्रातील शिक्षक व विद्यार्थी यांना कामातील



**सौ. सुषमा कुलकर्णी पुरस्कार स्विकारताना**

प्रावीण्याबद्दल देण्यात येतात. आय्.एस्.टी.ई. ही एकमेव संस्था आहे जी असे पुरस्कार देऊन गुणवंतांचा गौरव करते. हा पुरस्कार सोहळा यावर्षी तमिळनाडूमधील नामवंत इंजिनिअरींग कॉलेजमध्ये आयोजित केला होता.

ह्या पुरस्कारासाठी अर्ज भरण्यासाठी तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. डी. के. नायक यांनी त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी त्यांचे एम्. टेक्.चे संशोधन व्ही.जे.टी.आय्. मधील मार्गदर्शक श्री. एच्. अे. मंगळवेढेकर यांच्या सहकार्याने पूर्ण केले. त्यांच्या संशोधनाकरिता लागणाऱ्या कॉम्प्युटर आदी सुविधा त्यांना आय्.आय्.टी. (मुंबई) मधून प्राध्यापक श्री. एस्.अे.खापर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आल्या.

## विद्युत अभियांत्रिकी विभाग

''राजीव गांधी अपारंपारिक ऊर्जा दिन'' दिनांक २०/८/२००६ रोजी विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या Synergy Group ने साजरा केला.

या दिनानिमित्त तांत्रिक पेपर सादरीकरण स्पर्धा विविध तंत्रनिकेतनच्या शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी ''अपारंपारिक ऊर्जेचे नविन स्रोत'' हा तर शिक्षकांसाठी ''ऊर्जा बचतीचे नवीन उपाय'' हे विषय निवडले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. ए.ए. घाटोळे यांच्या हस्ते झाले. तर बक्षिस समारंभ श्री. बी. के. लांडे यांच्या हस्ते झाला. हा कार्यक्रम 'Medha' ने पुरस्कृत केला होता.

दिनांक २० सप्टेंबर २००६ रोजी Synergy Group ने ''ऊर्जेची बचत'' या विषयावर 'Poster and Slogan' स्पर्धा आयोजित केली. ह्या स्पर्धेमागच्या उद्देश मुलांना ऊर्जेबचतीचे महत्त्व पटवून देणे हा होता. या स्पर्धेतील Poster चे प्रदर्शन मांडण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन श्री. संदीप पारीख (G.M. Reliance Energy Ltd.) यांच्या हस्ते करण्यात आले.

दिनांक ७ जाने. २००७ रोजी ''वेळोवेळी खंडित होणारा विजपुरवठा'' या विषयावर एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. द्वितीय व तृतीय वर्षांच्या विद्युत अभियांत्रीकी विद्यार्थ्यांना विद्युत पुरवठा वेळोवेळी खंडित होण्यामागची कारणे व त्यावर कोणते उपाय योजता येतील यासंबंधी माहिती या कार्यक्रमात देण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. ए. एन्. बडे (निवृत्त M.S.E.B. अभियंता) हे होते.

दि. ७ जाने. २००७ ला श्री. समीर आठवले यांनी ''ऊर्जा बचत करणारे यंत्र'' विद्यार्थ्यांना दाखविले. त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी ऊर्जा बचतीचे आपल्या दैनंदिन आयुष्यात काय महत्त्व आहे. याबद्दल माहिती दिली. यामध्ये माजी विद्युत अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांचा सुद्धा सहभाग होता.

### Latest Trends in Nano technology

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे आयोजित Latest Trends in Nanotechnology या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. ही राष्ट्रीय परिषद पुढील वर्षी शनिवार, ५ जानेवारी २००८ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृह, ठाणे, कॉलेज कॅम्पस ठाणे (प.) महाराष्ट्र येथे होणार आहे, अशी घोषणा वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनातर्फे करण्यात आली आहे.

इच्छुकांनी अधिक चौकशीसाठी वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक व परिषदेच्या कार्यवाह प्रा. सौ. उषा राघवन यांच्याशी संपर्क साधावा.


दूरध्वनी क्रमांक : २५३६ ४४९४

**Website व Email : -**

Website : www.vpmthane.org

Email : nanovpm@gmail.com

Rajiv Gandhi renewable energy day celebration on 20th August 2006







Day was celebrated by organizing Technical paper presentation competition on "Emerging trends in alternative Energy sources" for students and "New techniques in energy conservation" for staff. The competition was inaugurated by Dr. A. A. Ghatol, Vice Chancellor B.A.T.U. and Dr. Milind Rane was Keynote Speaker. The Price distribution is done by the hands of Dr. B. K. Lande.

**Poster and slogan competition**




**Date : 20th Sept. 2006**

Chief Guest : Mr. Sandeep Parikh (G. M. REL)

Competition topic : Energy conservation



**Organised by : Synergy group**

Co-sponsored by : MEDA and TMC.

Motto : To create the awareness about the energy conservation.